# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १०/०६/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक १०/०६/२००९ रोजी सभा सुचना क्र. ५ दि. ०५/०६/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ६) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| ७) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| ८) | श्रीम. ग्रिटा फॅरो | -- | सदस्या |
| ९) | श्रीम. हेलन गोविंद जॉर्जी | -- | सदस्या |
| १०) | श्री. याकुब ई. कुरेशी | -- | सदस्य |
| ११) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| १२) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| १३) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| १४) | श्री. सिंह श्रीप्रकाश जिलेदार | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| २) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| २) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ३) | श्री. उत्तरेश्वर लोंढे | -- | सहा. संचालक नगररचना |
| ४) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ५) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ६) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ७) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| ८) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ९) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १०) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| ११) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १२) | श्री. संजय गोखले | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| १३) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १४) | श्री. राजकुमार कांबळे | -- | सहा. आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १५) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १६) | श्री. एन. के. सोनार | -- | शिक्षण अधिकारी |
| १७) | श्रीम. सिमा मिश्रा | -- | सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग |
| १८) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अशोक बागेश्वर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| ३) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ४) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ५) | श्री. राजेंद्र मारकड | -- | सहा. नगररचनाकार |
| ६) | श्री. सुनिल यादव | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| ७) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| ८) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ९) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| १०) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| ११) | श्री. स्वप्नील सावंत | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १२) | श्री हेमंत पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| १३) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वन |
| १४) | श्री. डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १५) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १६) | श्री. हंसराज मेश्राम | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| १७) | श्री. नागेश इरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| १८) | श्री. किरणे राठोड | -- | उप अभियंता, अतिक्रमण विभाग |
| १९) | श्रीम. चारुशिला खरपडे | - | आस्थापना विभाग |

**मा.सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. १०/०६/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५, दि. ०५/०६/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६, दि. ०२/०८/२००८, दि. १४/०८/२००८, दि. २८/०८/२००८ व दि. १०/०९/२००८ (दि. २८/०८/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**टेरी परेरा :-**

दि. ०२/०८/२००८, दि. १४/०८/२००८, दि. २८/०८/२००८ व दि. १०/०९/२००८ (दि. २८/०८/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या. मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचनांसह व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, इस इतिवृत्तांत को मंजूरी ८ वे महिने को दी है, ०८/२००८ को। हम लोग उस समय थे भी नही। तो उसमे क्या था क्या नही हमको मालूम भी नही। और जिस समय हम लोग आये तबसे हमारा इतिवृत्तांत आया भी नही। और मेरे ख्याल से जभी आयेगा तब हम भूल भी चूके होंगे की, हमने क्या बोला क्या नही बोला? और इस विषय को इसके पहले कई बार चर्चा हो चूकी है की, स्थायी का इतिवृत्तांत है वह दुसरे तिसरे मिटींग मे मिलना चाहिए। लेकीन ६-६, ८-८ महिने के बाद मिलता है तो ऐसे कभी तक चलेगा। यह क्या है? क्या हो रहा है?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, सुचना अशी होती की, मागे, मी सचिवांना अशी सूचना केली होती की, एक मिटींग अशी लावा उर्वरीत राहिलेली इतिवृत्तांत संपवून टाका.

**नगरसचिव :-**

१० इतिवृत्तांत तयार आहेत. एकदम देवू का?

**मिलन म्हात्रे :-**

स्पेशल मिटींग लावा. तुमच्याही कामाचा निपटारा विचार होवून जाईल.

**नगरसचिव :-**

ठिक आहे. तुम्हाला ८ इतिवृत्तांत देतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेबांशी फायनल करुन, इतिवृत्तांताची मिटींग लावा.

**नगरसचिव :-**

पहिले या आठवड्यामध्ये इतिवृत्तांत देतो आणि पुढच्या सभेत ठेवतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेबांशी नक्की करुन आजच्या मिटींगमध्ये फायनल करुन घ्या. इतिवृत्तांताची मिटींग.....

**नगरसचिव :-**

पहिले इतिवृत्तांत पाठवून देतो. नंतर तारीख फिक्स करतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

त्याच्यानंतर असे ठरले की, दर दोन मिटींग नंतर तिसऱ्या मिटींगमध्ये इतिवृत्तांत पाहिजे. जर इतिवृत्तांत देत नाही तर मिटींगच लावायची नाही.

**मिलन म्हात्रे :-**

दर दोन मिटींगच्या नंतर नाही प्रत्येक मागच्या मिटींगचे इतिवृत्तांत आले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ती प्रशासनाची चूक नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मग, आमची चूक आहे का?

**मा. सभापती :-**

अजेंडावर विषय घ्यायला पाहिजे ना, सभापतींचे स्वतःचे ते अधिकार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, असं आहे की, एखाद्या ठरावात इतिवृत्तांतला मंजूरी नसेल तर कामे होत नाही.

**मा. आयुक्त :-**

कामे होतात. ठराव झाले, इम्प्लीमेंट झाले. काम होवून गेले. आता विचार करुन करणार काय? ज्यावेळेला मागच्या स्टॅन्डीग कमिटीमध्ये जे जे ठराव झाले त्याचे इम्प्लीमेंट झाले. आता समजा तुम्ही विचार केला आणि हे रद्द करायचे ठरवले तरी त्याचा उपयोग काय होणार?

**याकुब कुरेशी :-**

मग ते आणता कशाला?

**मदन उदितनारायण सिंह :-**

म्हणून तर सांगतो की, लगेच इतिवृत्तांत द्यायचे.

**मा. आयुक्त :-**

म्हणून तुमचे जे सजेशन आहे की, पहिली मिटींग झाल्यांनतर दुसऱ्या तिसऱ्या मिटींगमध्ये मिनिट्स यायला पाहिजे. तशी एक सुचना आता झाली ना आणि का राहिले त्याचे उत्तर मी आता काय देवू शकत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कमिशनर साहेब, ही सुचना आता झालेली नाही. पहिल्यांदा पण झालेली आहे.

**मा. आयुक्त :-**

आता सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६ :-**

प्रकरण क्र. ६, दि. ०२/०८/२००८, दि. १४/०८/२००८, दि. २८/०८/२००८ व दि. १०/०९/२००८ (दि. २८/०८/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १० :-**

दि. ०२/०८/२००८, दि. १४/०८/२००८, दि. २८/०८/२००८ व दि. १०/०९/२००८ (दि. २८/०८/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या. मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचनांसह व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. टेरी परेरा** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७, दुहेरी नोंद लेखा पध्दतीची निवीदा स्विकारणेबाबत.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. हे दुहेरी लेखी पध्दती जी आहे. म्हणजे तुम्ही नक्की काय करणार आहात? जरा सदस्यांना कल्पना द्या ना.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, आतापर्यंत आपण जो महापालिकेचा जमा-खर्च ठेवत होतो तो महापालिकेचे उत्पन्न आणि महापालिकेचा खर्च. म्हणजे प्रत्यक्षात किती पैसे येते आणि किती जाते ह्याचाच हिशोब अकाउंट कोडप्रमाणे ठेवत होतो. एबल इन्ट्री सिस्टम म्हणजे महापालिकेची मिळकत काय आहे? म्हणजे महापालिकेची स्थावर मालमत्ता, मग ऑफीस बिल्डींग असेल, प्रभाग समिती बिल्डींग असेल, स्मशानभूमी असेल, रोड असेल, गार्डन असेल, प्राथमिक शाळा असतील किंवा शॉपिंग सेंटर असेल, सामाजिक मंदिर असेल, समाज मंदिर असेल या सगळ्यांचे व्हॅल्युएशन काढून अकाउंटला घ्यायला पाहिजे. म्हणजे या मिरा भाईंदर महापालिकेची पैसे सोडून देखील आपली आर्थिक ताकद किती आहे?

**अनिल सावंत :-**

म्हणजे थोडक्यात प्रॉफीट आणि लॉस बॅलन्सशीट बनवणे. मग, हे दुहेरी लेखा पध्दतीमध्ये घेतल्यानंतर समजा आज मिटींग आहे. आजच्या डेटला ह्या आर्थिक वर्षामध्ये महापालिकेचे टाळेबंद आम्हाला मिळू शकतो.

**मा. आयुक्त :-**

मिळू शकते. समजा एखादी बँक म्हणा किंवा गर्व्हमेंट संस्था म्हणा. ती आर्थिक आवक आणि जावक बघूनच कर्जाचा विचार केला जातो. परंतु, आमची प्रॉपर्टी बघून पण कर्जाचा विचार केला गेला पाहिजे आणि त्याचे व्हॅल्युऐशन रिफ्लेक्शन होते. आता आपण ह्या व्हॅल्युऐशनमध्ये स्मशानभूमीमध्ये फक्त १ रुपया खर्च करतो. नंतर त्या आधारावर आपल्याला कर्ज दिले तर त्याची किंमत काही येणार नाही. बाकीची जी काय प्रॉपर्टी आहे त्याचे व्हॅल्युऐशन टू व्हॅल्युऐशन घेतो. त्याच्यात डबल इन्ट्री सिस्टममध्ये कन्टीन्यु वापर व्हायला पाहिजे. म्हणून आपण टेंडर काढला आणि जे.एन.एन.यु.आर.एम. ची जी स्कीम आहे त्याच्यामध्ये हे केल्याशिवाय पूढचे प्रपोजल मंजूर करणार नाही. त्यात एक आयटम आहे.

**अनिल सावंत :-**

आपण डबल इन्ट्री सिस्टम चालू करणार. कम्प्युटरायझेशन जवळ-जवळ २००६ पासून घेतो. म्हणजे साधारणतः ३-४ वर्ष झाली. पैसे आपण पूर्ण देतो, सॉफ्टवेअर पॅकेजचे पैसे पूर्ण देतो. स्टाफ मेन्टेनन्सचे जवळ-जवळ दिड लाख रु. महिन्याला खर्च करतो. पण आज फक्त १५ टक्के उपयोग त्या कॅप्युटरायझेशनचे होते. तर, ही डबल इन्ट्री सिस्टम तुम्ही सॉफ्टवेअर पॅकेज होणार आहात. त्या बाबतीत एक काळजी धेतली जावी. तेव्हा एक टाईम लावून पिरेड घ्या. कारण अजूनही काही मॅन्युअल्टी रिसीट फाडल्या जातात. प्रॉपर्टी टॅक्सच्या पाण्याची बिल तर जातच आहे. प्रॉपर्टी टॅक्सचे एवढ्या पासून संपूर्ण कॉम्प्युटरायझेशनच्या डिपार्टमेन्टचे व्हायला पाहिजे होतो. जो आपण खर्च केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, याविषयी मी वेळोवेळी त्या कॉन्ट्रॅक्टरांना बोललेलो आहे. कारण मागच्या वेळात २००३ मध्ये कॉम्प्युटरायझेशन केले गेले. त्या ॲग्रीमेन्टमध्ये त्यांनी आमच्या कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देवून निघून जायचे आहे. ट्रेनिंग जर दिले आणि ते निघून गेल्यानंतर त्याचे इन्कम जे होईल म्हणून त्यांनी आमच्या लोकांना फुल ट्रेन केले नाही. म्हणून त्यांना चर्चेसाठी मी बोलावलेले आहे. त्यांनी टायमिंग मागितला आणि मी त्यांना पैसे देण्याचे बंद केले आहे. मला वाटतं २००७-०८ पासून आपण पैसे देत नाही. ते पैसे द्या म्हणून पाठीमागे लागले. मी काय पैसे देणार नाही, म्हणून सांगितले नाही. कारण आपण त्यांच्याकडून ७ सॉफ्टवेअर घेतलेले आहे. त्यापैकी ३ तो चालवतो. बाकीचे खरेदी केलेले आहे. पण ते चालवलेले नाही.

**अनिल सावंत :-**

वापर होत नाही म्हणून त्या कर्मचाऱ्यांना त्याच्याबद्दल काही माहितच नाही.

**मा. आयुक्त :-**

माहिती दिलीच नाही. त्यांचाच अधिकार येणार, त्यांचेच कोड त्यांना माहित असणार त्यामुळे तो आपल्याला कायम स्वरुपीचा अज्ञानीत होतो. म्हणजे त्याचे दुकान चालू राहण्यासाठी. त्यामुळे त्यांना आम्ही काढून टाकून दुसऱ्याला नेमण्यासाठी चर्चा केली त्यामध्ये आपल्याला १५-१६ कोटी रुपयांचे ते इन्व्हेस्टमेन्ट करणार आहेत. आपल्याला २-३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. आणि ३५ सॉफ्टवेअर तो युज करणार आहे आणि बीओटी तत्वावर चालणार आहे. उदा. टेंडर फॉर्मचे ५०० रु. किंमत आहे तर तो १० रु., १५ रु. घेणार आणि आपल्याला ५०० रु. मधले १५-२० रुपये कमी करणार. जन्माचा दाखला आमचे १० रु. असेल तर २ रु. तो घेणार आणि ८ रु. महापालिकेला देणार. या पध्दतीने करायची चर्चा चालू आहे. आता सगळ्या खाते प्रमुखांना आदेश दिलेला आहे. आता सगळ्या खाते प्रमुखांना एक दिवस त्यांना बोलावून बघून घ्या. कोल्हापूर आणि नांदेडला काही खर्च न करता चालू आहे. त्यांना बोलावले होते. म्हणजे आता आपण कल्याण-डोंबिवलीच्या नावावर २ लाख रुपये पर मन्थ देतो आणि तो तिकडून महापालिकेच्या नावावर पैसे घेतो.

**अनिल सावंत :-**

राज्य शासनाकडून.

**मा. आयुक्त :-**

त्यामुळे हा रिकरिंग खर्च पण आहे आणि २००३ ला ॲग्रीमेन्ट केले. २००७ पर्यंत त्या स्टाफला ट्रेनिंग दिलेच नाही. त्यामुळे त्याचे जे बिल आहे ते बिल दिले नाही.

**जुबेर इनामदार :-**

आपण ३ वर्षाची जी फॅसिलीटी मागणार आहोत. तर, ३ वर्षाची गरज आहे का? याला ३ वर्ष लागतील.

**मा. आयुक्त :-**

डिसेंबरपर्यंत डबल इन्ट्री पूर्ण करणार आहे आणि ३ वर्ष त्यांच्या स्टाफला येवून चालवून आमच्या स्टाफला पण ट्रेनिंग देणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तेच सांगतो. ३ वर्ष लागणार का?

**मा. आयुक्त :-**

हो. लागणार.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपल्याकडे अकाउंट डिपार्टमेंटची लोक कामाला आहेत, तर त्यांना ही काम दिले. कारण शिपाई नसणारच आणि जर त्यांना माहित असेल तर त्यांनी त्यांना डबल इन्ट्री सिस्टम शिकवायची. लेझरमध्ये ते कन्वर्ट करायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यात बांधकाम डिपार्टमेंट आहे, आरोग्य डिपार्टमेंट आहे, पाणी पुरवठा आणि सर्व डिपार्टमेंटच्या डिसेंबर पर्यंत पूर्ण करायचे आहे. सर्व अकाउंटमध्ये रिफ्लेक्शन व्हायला पाहिजे. नंतर त्यांनी तीन वर्ष चालवून आमच्या स्टाफला बसवून दररोज लिहायचे आहे आणि जे.एन.एन.यु.आर.एम. मध्ये डबल इन्ट्री पाहिल्या शिवाय पूढची स्किम मंजूर होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही जी आता सीएफसी ची माहिती दिली. कल्याण-डोंबिवलीवाल्यांना आजही पैसे देतो. त्यांना शिकवले नाही. आपली ॲग्रीमेन्ट तर झालेली आहे. त्या माणसाने एवढी वर्ष फसवणूक म्हणा किंवा काहीही आपल्याला त्या डिपार्टमेंटमध्ये आतापर्यंत जे नेमले गेले होते त्या लोकांनी असे आयुक्त कार्यालय किंवा स्टॅन्डीगचे सभापती किंवा मा. महासभा या लोकांना काही कळवले की नाही की, एवढा आणि असा असा लॉस होतो किंवा ज्या माणसाला आपण काम दिले. त्या माणसांनी अशा-अशा चूका केल्या. ॲग्रीमेन्टमध्ये हे नक्की झाले पण हा करत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचा एवढा-एवढा लॉस ह्या माणसांकडून झालेला आहे असे काही कळवले का? आणि त्यांनी का कळवले नाही? कळवले नसेल तर का कळवले नसेल? कारण ह्यांना फॅसिलीटी सगळे आहे. आपण एखादा अधिकारी आणून बसवतो. त्याला तुम्ही सर्व फॅसिलीटी दिल्यानंतरच्या आस्थापनेवरती उपभोगता येते ते उपभोगतो. ह्याचा फायदा तोटा त्यांनी बघितला पाहिजे ना.

**जुबेर इनामदार :-**

सन २००३ साली तुम्हीच या कॅम्प्युटर पध्दतीला सुरुवात केली असेल. २००३ नंतर आज २००९ इतक्या वर्षामध्ये या विषयामध्ये कोणी लक्ष घातले नाही. साहेब, तुम्ही सक्षम आहात. तुम्ही त्या विषयाची काळजी घेतली. या शहरांनी तुमचे आभार मानायला पाहिजे. आज तुम्ही या विषयाबद्दल चर्चा करता आणि तुम्ही त्यांचा पेमेन्ट थांबवले आता हा तीन वर्षाचा काळ परत तसाच आहे. कदाचित ह्या तीन वर्षामध्ये हा विषय संपवायचाच नाही. परत ते तसचं चालत राहील. म्हणून जे करायचे असेल त्याला अंकुश आताच लावा आणि तीन वर्षानंतर त्याला हाकलायचे.

**मा. आयुक्त :-**

आतापर्यंत त्याचे २५ लाखापर्यंतचे बिल अडवलेले आहे. म्हणजे देणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही त्या विषयाला पुढाकार घेतलेला आहे. आणि तुम्ही त्याचे पेमेन्ट थांबवले आहे आणि ह्याच्यामध्येसुध्दा आता चाललेला आहे. तीन वर्षाची मागणी आपण आता केलेली आहे. कदाचित त्यांना मुदतवाढसुध्दा परत देण्यात येईल असे होता कामा नये. तुम्ही आमच्या लोकांना तीन वर्षापर्यंत ट्रेन करायचे, तुम्ही घेउन चालतं व्हायच. नाही केले तर त्यांच शेवटच्या वर्षाचं पेमेन्ट थांबवून ठेवा. You have certified to people they are ready for it.

**मा. आयुक्त :-**

आपले पूर्वीच ६४ लाखाच टेंडर आलेले होते. मी पाहिलेले नाही म्हणून तुम्हाला तहकुब करा म्हणून मी अशी विनंती केलेली होती आणि आता आपण २६ लाखाला देतो.

**अनिल सावंत :-**

डबल एन्ट्री सिस्टीम आपल्याला करायचे आहे. आपण बोलतोय ते कॉम्प्युटरायझेशन जे सॉफ्टवेअर आहे त्याच्याबद्दल मा. आयुक्त साहेब ज्यावेळी तुम्ही नव्हता त्यावेळी मन्थली मेन्टनन्स त्याचा विषय मा. स्थायी समिती समोर आला त्यावेळी आम्ही विरोध केला होता. त्यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांना पैसे द्यायला पाहिजे. १ लाख ८० हजार रुपये त्यांना देण्याचा विषय आला. हा ठराव स्टॅन्डीग समोर ज्यावेळी आला त्यावेळी. कारण, १५ टक्के वापरतो आणि सॉफ्टेवअर युझच होत नाही. मला असे वाटते की, आपले जे सिस्टम मॅनेजर आहेत, हे चांगले सॉफ्टेवअर इंजिनिअर आहेत. ते कुठे तरी कमी पडतात का? त्यांच्याकडून आपण काम करुन घेउ शकत नाही का? कारण त्यावेळी त्यांनी सांगितले की, आपल्याला पैसे द्यावे लागतील. आपण त्यांच्याकडून उपयोग करुन घेत आहोत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, या विषयावर आम्हाला पण एवढेच म्हणायचे आहे. तीन वर्षानंतर पण आता आम्हाला कल्याण-डोंबिवली पैसे देतो तर त्यांना पण चार्ज द्यावा लागणार का?

**मा. आयुक्त :-**

नाही द्यावा लागणार.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जोपर्यंत आपली महापालिका तीन वर्षापर्यंत करेल.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या गोषवाऱ्यामध्ये आपण १ ते ८ स्लॅप दिलेले आहेत. काय केल्यानंतर किती पेमेन्ट करायचे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

स्लॅप कुठे आहे? १ ते ८ कॉम्पीटीटर आहे.

**मा. आयुक्त :-**

कॉम्पीटीटर आहे. परंतु, आपल्याला जे ॲग्रीमेन्ट करायचे आहे. तो तक्ता व्हाईस करायचा आहे. टोटल एकदम रक्कम दिली तर तो माणूस परत येत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कसे आपण देतो? कुठल्या टप्प्याने किती देणार......

**जुबेर इनामदार :-**

३ वर्षामध्ये आपले कर्मचारी काम बघतील.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. ॲडवान्स झाले त्याची वर्क ऑर्डर १५ टक्के स्टडी टू ॲनालिसेस ऑफ एक्जेस्टींग अकाउंन्टींग सिस्टम १० टक्के आणि कम्युनिटी २५ टक्के प्रिकॉशन ऑफ चार्ज अकाउंन्ट फॉर कम्प्युटर सिस्टम पेमेन्ट १० टक्के, कम्युनिटी ३५ टक्के ट्रायल बॅलन्स, ओपनिंग बॅलन्स ॲन्ड बॅलन्सशीट फॉर ७-८ २५ टक्के टू ६० टक्के सुपरीझन ऑफ डेटा इंट्री ऑफ ८-९, १५ टक्के टू ७५ टक्के, कम्प्लीशन ऑफ बॅलन्सशिट फॉर ८-९, २५ टक्के टू १०० टक्के फॉर हॅन्ड होल्डींग सपोर्ट १०० टक्के ॲन्ड मन्थली बेसिस बिथ इन ५ डेज ऑफ सबमिशन ऑफ रिपोर्ट ॲन्ड हीम.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, हा जो टप्पाव्हाईस पेमेन्ट झाला. माझा फक्त चर्चेमध्ये आणायचा एवढाच विषय आहे की, ३ वर्षानंतर आपली लोक त्याच्यामध्ये तयार झाली पाहिजे. आजची जी आपली परिस्थिती आहे ती परत होता कामा नये. असे तुमच्या लक्षात आले म्हणून तुम्हाला त्याला कुठे तरी अंकुश लावला. हे तीन वर्ष तुम्ही नाही राहणार. तुमच्या जागेवर कोणतरी दुसरे आयुक्त येतील.

**मा. आयुक्त :-**

४० टक्के रक्कम ही आपल्या लोकांचे ट्रेनिंग संपल्यानंतर देण्यात येईल. बाकीची सगळी रक्कम द्या. परंतु, ४० टक्के रक्कम ठेवा. टप्पेव्हाइस रक्कम करा. पहिला फक्त १० टक्के द्या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आणि त्यांना टाईम लिमिट द्या.

**मा. आयुक्त :-**

टाईम लिमिट आणि शेवटचे पेमेन्ट ४० टक्के ठेवू.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, जर मध्येच हा सोडून गेला तर आपल्याकडे तशी कंडीशन आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपण त्याच्याकडून डिपॉझीट घेणार ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

डिपॉझीट किती घेणार?

**मा. आयुक्त :-**

हे पहा, या कंपन्या आहेत ना, हे चार महानगरपालिकेत काम करतात. चार महापालिकेत काम करत असल्यामुळे त्यांचे गुडविल आहे. आता ऑलरेडी ३-३, ४-४ वर्ष चालवतात. आपण ब्लॅक लिस्ट केले तर त्यांना काढून टाकायला लागते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तरीसुध्दा आपण काही तरी डिपॉझीट घेणार ना.

**मा. आयुक्त :-**

घेवू ना.

**मा. सभापती :-**

आपण त्यांना देणार आहे. मग, डिपॉझीट कसे घेणार?

**मा. आयुक्त :-**

बिलातून कट करुन घेउ. बील करायचे बिलातून कापून घ्यायचे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कमिशनर साहेब, कॉम्प्युटरायझेशन की बात आप बोल रहे है की, अपना जो कॉम्प्युटराझेशन सिस्टम जो है खाली १५ % काम कर रहा है। मुझे जहा तक मालुम है, हर डिपार्टमेन्ट के हेड को कॉम्प्युटर या लॅपटॉप दिया गया है। लेकीन वह भी किसी काम का नही। वह भी ऐसा ही पडा है। तो क्यों उनको दिया गया है?

**मा. आयुक्त :-**

इसलिए मैने आपसे स्टार्ट में ही बात की, हम कंपनीसे डिस्कस कर रहे है। डिस्कस हो जाने के बाद सब खाते प्रमुख को लेक बैठेंगे और डिसाईड करेंगे बीओटी के उपर हम ला रहे है। कॉम्प्युटराझेशन का खर्चा कम होगा। और ३५ सॉफ्टवेअर है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

वह ठिक है जैसे की हम लोगोंको लॅपटॉप जरुरत क्या है। आज जो सब हेड को लॅपटॉप दिया है वह किसी कामका नही है। वह उनके घर पे पडा हुआ है।

**मा. आयुक्त :-**

लॅपटॉप युज करने को किसी लागोंको आता नही है, इसलिए बोला।

**मदन उदितनारायण सिंह :-**

नही तो इस सिस्टम को कॉम्प्युटरायझेशन करके सबको दिया जाए और उसका अच्छी तरह से युज कैसे होगा यह देखा जाए।

**मा. आयुक्त :-**

जिनको युज करने आता है उनको दिया है। और जिनको युज करने नही आता उनको नही दिया है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

और ऑफीसर के पास जो लॅपटॉप कम्प्युटर है हर डिपार्टमेंट को कैसे युज मे आयेगा वह देखा जाए।

**मा. आयुक्त :-**

जिनको युज करना आता है उनको ही दिया है। जिनको आता नही उनको नही दिया।

**मदन उदितनारायण सिंह :-**

उनको ट्रेनिंग दिजीए ना।

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर अजून दिले नाही. आपले जे सिस्टीम मॅनेजर आहे, ते कुठे कमी पडतात का?

**मा. आयुक्त :-**

एबीएम कंपनीवाल्यांना बोलावले आहे. त्यांच्याशी चर्चा करुन तुम्हाला सविस्तर रिपोर्ट देतो.

**अनिल सावंत :-**

सविस्तर रिपोर्ट द्या आणि आमच्या सर्व सदस्यांतर्फे तुम्ही आता जो निर्णय घेतलेला आहे की, त्यांचा पेमेन्ट स्टॉप करायचा. एक चांगला निर्णय घेतलेला आहे. जोपर्यंत आलेले सॉफ्टवेअर १०० टक्के युज होत नाही तोपर्यंत ह्याल कुठचेही पेमेन्ट देवू नये. ही सर्वानुमत आमची सुचना घ्या.

**मा. आयुक्त :-**

मान्य आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दुहेरी नोंद लेखा पध्दतीची निविदा दि. ९.४.०९ रोजी महाराष्ट्र टाईम्स व Times of India या वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| Sr. No. | Name of Company | Succesful Commissioning & Implementation of Double Entry Accounting System | Facility Management Service Contract | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. AMN & Associates | 16,00,000/- | 3,50,000/- Per Year x 3 = 10,50,000/- | 26,50,000/- |
| 2 | M/s. Upasani Jain & Kshirsager | 30,90,000/- | 1) 4,80,000/- Per Year<br>2) 5,40,000/- Per Year } = 16,20,000/-<br>3) 6,00,000/- Per Year | 47,10,000/- |
| 3 | M/s. Roy Ghosh & Associate | 24,90,000/- | 5,90,000/- Per Year x 3 = 17,70,000/- | 42,60,000/- |
| 4 | M/s. Dhamankar & Modi | 62,00,000/- | 9,00,000/- Per Year x 3 = 27,00,000/- | 89,00,000/- |
| 5 | M/s. Patki & Soman | 36,00,000/- | 60,00,000/- Per Year x 3 = 18,00,000/- | 54,00,000/- |
| 6 | M/s. S. C. Kabra & Co. | 96,00,000/- | 18,00,000/- Per Year x 3 = 54,00,000/- | 1,50,00,000/- |
| 7 | M/s. Bagaria & Co. | 38,65,500/- | 3,30,900/- Per Year x 3 = 9,92,700/- | 48,58,200/- |
| 8 | M/s. Fortress Infrastu. | 25,00,000/- | 60,00,000/- Per Year x 3 = 18,00,000/- | 43,00,000/- |

वरील प्राप्त निविदा पाहता M/s. AMN & Associates यांची कमी दराची निविदा असून वाटाघाटी नंतरचे दर विचारात घेउन व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार त्यांनी काम पुर्ण करून दयावयाचे आहे. त्यानंतरच देयके प्रदान करण्यात यावीत. M/s. AMN & Associates यांची कमी दराची निविदा स्विकारण्यास आजची सभा मंजुरी देत आहे.

**याकुब करेशी :-**

ह्याच्यात ४० टक्के रक्कम बाकी ठेवण्याचे ठरलेले आहे. तेसुध्दा नमुद करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

ट्रेनिंग दिले, पण आपल्या लोकांना ते इन्डीपेडंन्ट आले पाहिजे. तिथपर्यंत देईन. त्यांनी केले म्हणून त्यांना सर्टीफिकेट तर देवून गेले ना.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणूनच सांगतो आता त्यांनी जसे स्टार्ट केले. ६ महिन्यात प्रत्येक डिपार्टमेन्टची ६-६ माणसं म्हणजे स्टार्ट केल्याबरोबर शेवटपर्यंत आपल्या माणसांची पण ट्रेनिंग होईल ना. तीन वर्षाचा गॅप मिळतो ना.

**मा. आयुक्त :-**

म्हात्रे साहेब, त्यावेळेला आपली कल्पना अशी होती की, आपले टोटल खातेप्रमुख आणि सर्व क्लार्क कम्प्युटर चालवायला पाहिजे. अशी अट आपण त्या ॲग्रीमेन्टमध्ये घातली होती.

**मिलन म्हात्रे :-**

पण, त्याच्यात असे झाले की, त्यांनी आपल्या स्टाफला मुद्दामहून ट्रेनिंग दिले नाही. मला आठवते की, स्टाफ जायचासुध्दा. कारण तिकडे सीएफसी चालू झाली आणि निराळे उद्योग सुरु झाले. नंतर नंतर तर आपल्या स्टाफला कॉम्प्युटरला हात पण लावू द्याचे नाही. म्हणून आता ह्यांना स्टार्ट केल्यावर बॅच पण लागल्या पाहिजे की, १० माणसं ह्या डिपार्टमेन्टची अलग अलग पाठवली पाहिजे. नाहीतर उद्या तो बोलेल की, तुमची माणसं आली नाही तर मी शिकवणार कसं काय?

**मा. सभापती :-**

सदर ठराव सुचनासकट सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७ :-**

प्रकरण क्र. ७, दुहेरी नोंद लेखा पध्दतीची निवीदा स्विकारणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

| Sr. No. | Name of Company | Succesful Commissioning & Implementation of Double Entry Accounting System | Facility Management Service Contract | Total |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. AMN & Associates | 16,00,000/- | 3,50,000/- Per Year x 3 = 10,50,000/- | 26,50,000/- |
| 2 | M/s. Upasani Jain & Kshirsager | 30,90,000/- | 1) 4,80,000/- Per Year<br>2) 5,40,000/- Per Year } = 16,20,000/-<br>3) 6,00,000/- Per Year | 47,10,000/- |
| 3 | M/s. Roy Ghosh & Associate | 24,90,000/- | 5,90,000/- Per Year x 3 = 17,70,000/- | 42,60,000/- |
| 4 | M/s. Dhamankar & Modi | 62,00,000/- | 9,00,000/- Per Year x 3 = 27,00,000/- | 89,00,000/- |
| 5 | M/s. Patki & Soman | 36,00,000/- | 60,00,000/- Per Year x 3 = 18,00,000/- | 54,00,000/- |
| 6 | M/s. S. C. Kabra & Co. | 96,00,000/- | 18,00,000/- Per Year x 3 = 54,00,000/- | 1,50,00,000/- |
| 7 | M/s. Bagaria & Co. | 38,65,500/- | 3,30,900/- Per Year x 3 = 9,92,700/- | 48,58,200/- |
| 8 | M/s. Fortress Infrastu. | 25,00,000/- | 60,00,000/- Per Year x 3 = 18,00,000/- | 43,00,000/- |

वरील प्राप्त निविदा पाहता M/s. AMN & Associates यांची कमी दराची निविदा असून वाटाघाटी नंतरचे दर विचारात घेउन व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार त्यांनी काम पुर्ण करून दयावयाचे आहे. त्यानंतरच देयके प्रदान करण्यात यावीत. M/s. AMN & Associates यांची कमी दराची निविदा स्विकारण्यास आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. याकुब कुरेशी यांनी खालील सुचना मांडली.**

देयकातून ४० टक्के रक्कम ठेवावी. मनपा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर व कर्मचाऱ्यांना दुहेरी नोंद लेखा पध्दत आल्यानंतरच पूर्ण देयक देण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शाळा इमारती बांधणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. सभापती साहब, यह जो स्कुल बनना है। वहॉ पे कौनसा स्कुल बनना है। कवले का है उनको तोडके बनायेंगे या कैया बनायेंगे? या फिर उनको ही रिपेअरिंग करना है। नया बनायेंगे तो भी कितने माले का है? मा. सभापती साहब स्कुल जो बननेवाला है। वहॉ पहले से ही स्कुल है। तो तोडके बनायेंगे या उसको ही रिपेरींग करेंगे?

**मा. आयुक्त :-**

रिपेरिंग क्यों करेंगे, नया बाँधेंगे ना।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

तो नया स्कुल कितना माले का बनायेंगे? कितना एफ.एस.आय. है?

**मदन उदितनारायण सिंह :-**

एफ.एस.आय. कितने माले की बिल्डींग रहेगी? कितना रुम बनेगा?

**दिपक खांबित :-**

हर साल यहॉ पे स्कुल बनाते है, तो इस सबके लिए २ स्कुल लिये।

**मदन उदितनारायण सिंह :-**

बनना चाहिए। २ नही ४ स्कुल बनना चाहिए। लेकीन उसकी माहिती तो चाहिए की, कितना माला बनेगा? कितना रुम बनेगा? टोटल कितना फुट काम होगा?

**मा. आयुक्त :-**

राईच्या शाळेमध्ये गुजराती आणि मराठी असे दोन माध्यम आहेत. त्यामुळे तिथे दोन फ्लोअर घ्यावे लागेल. वरच्या मजल्यावर किंवा खालच्या मजल्यावर गुजराती मुले जास्त आहेत. त्यामुळे राईची शाळा......

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आपली जी दलित वस्तीची ग्रॅन्ड येते. मी त्या शाळेत जावून आलो. तिकडे आदिवासी मुले असतात. टोटल आदिवासीच मुले आहेत आणि ३ वर्गाला एक शिक्षक शिकवतो. मी स्वतः जावून आलो. तो बोरीवलीचा शिक्षक आहे.

**जुबेर इनामदार :-**

माश्याचा पाड्याच्या स्कुलमध्ये सध्या किती विद्यार्थी आहेत?

**एन. के. सोनार :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. माशाचा पाडा ही आदिवासी भागातील शाळा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तिकडे पाहणी केली का?

**एन. के. सोनार :-**

हो केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती तारखेला केली आहे? एक शिक्षक तीन वर्गाला शिकवतो.

**एन. के. सोनार :-**

नाही सर तिथे अजून शिक्षक आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

वर्ग किती?

**एन. के. सोनार :-**

चार, आणि १०० विद्यार्थी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तिकडचा एक शिक्षक बोरीवलीला राहतात ना, एकदम यंग मुलगा आहे. तो तीन वर्गात शिकवताना मी बघितले आहे.

**एन. के. सोनार :-**

साहेब, आता दोन शिक्षक आहेत.

**याकुब कुरेशी :-**

तिकडे १०० विद्यार्थ्यांना तुमच्या हिशोबाने किती शिक्षक पाहिजेत?

**एन. के. सोनार :-**

१०० विद्यार्थ्यांना २ शिक्षक पाहिजे. ५० विद्यार्थ्यांना एक शिक्षक, तर १०० विद्यार्थ्यांना दोन शिक्षक पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

सध्याच्या परिस्थितीत त्या शाळेला दुरुस्तीची गरज आहे की, पूर्ण बांधकाम करावे लागेल?

**एन. के. सोनार :-**

साहेब, ती शाळा आहे ती खाजगी मालकीच्या जागेमध्ये आहे.

**जुबेर इनामदार :-**

चालली आहे. तर त्याला काय कोणाची अडचण आहे का?

**एन. के. सोनार :-**

बांधकाम संदर्भात तर अडचण आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

बांधकामाचे नाही. पण सध्या शाळेमध्ये कोणाची काय अडचण आहे का? थांबवता की तुम्ही ही शाळा चालवू नका.

**मा. आयुक्त :-**

ती इमारत व्यवस्थित नाही. म्हणून बांधायला लागेल.

**शानु गोहिल :-**

हम लोगो को जानकारी तो देना चाहिए ना।

**जुबेर इनामदार :-**

आणि जिथे गरज आहे, मुन्शी कंपाउंडमध्ये, मिरा गावठणमध्ये ती शाळा आहे. तिथे किती विद्यार्थी आहेत.

**एन. के. सोनार :-**

५५० विद्यार्थी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

५५० विद्यार्थी आहेत. ती तिकडे वरांड्यामध्ये बसतात. साहेब, जिथे आधी गरज आहे तिथे खर्च करा ना. पूर्ण १ कोटी रु. तर १ कोटी. पाहिजे तर १ कोटी ५० लाख रु. खर्च करा. जास्त खर्च करा ना.

**शानु गोहिल :-**

मुन्शी कंपाउंड मे उर्दु बच्चे बाहर बैठते है। जहा पर गरज है वहॉ पर खर्चा किजीए।

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, अल्पसंख्यांकासाठी स्पेशल ग्रॅन्ड मिळते. त्यामधून ज्या अल्पसंख्यांकाच्या ज्या उर्दु शाळा आहेत. जरी तिथे मराठी विद्यार्थी असेल तरी अल्पसंख्याकाचा स्पेशल ग्रॅन्ड आहे. त्यामध्ये मिरारोड आणि ईस्टचे घ्या. ते आपण तुर्त चालू करु. परंतु, ह्यांच्या शाळेतली मुले वरांड्यात बसतात ती एक शाळा घ्या आणि वेस्टची शाळा घ्या आणि आदिवासींचे जे आहे त्यांना त्यांचे ग्रॅन्ड मिळते.

**मिलन म्हात्रे :-**

दलित वस्तीचे काय झाले?

**मा. आयुक्त :-**

दलित वस्तीचे ग्रॅन्डमधून घेउ ना.

**मिलन म्हात्रे :-**

जागेचा प्रॉब्लेम काय आहे?

**मदन उदितनारायण सिंह :-**

जागा खाजगी आह असे ते म्हणतात ना.

**दिपक खांबित :-**

साहेब, जागेचं म्हणजे झेड.पी......

**मिलन म्हात्रे :-**

झेड.पी. ने त्यांची खाजगी घेतली ना.

**अनिल सावंत :-**

मिरा गावठणमध्ये शाळा आहे ना. तर त्याचे काम कधी चालू करणार? ५५० विद्यार्थी आहेत.

**दिपक खांबित :-**

आता ठराव मंजूर झाला ना की, लगेच मंजूर करणार.

**अनिल सावंत :-**

५५० विद्यार्थी आहेत आणि ते वरांड्यामध्ये बसतात. शहराचे दुर्देव आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये तुम्ही मिरारोडची उर्दु शाळा पण घ्या आणि ह्या तिघांची आम्ही अधिकाऱ्यांना प्रशासकीय मंजूरी देतो आणि भाईंदर वेस्टचे पण घ्या.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. आयुक्त साहब, राई गांव मे कितने बच्चे है?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, एक प्रश्न आहे की, गेल्या वर्षी आपली पटसंख्या किती होती आणि ह्यावर्षी किती आहे?

**एन. के. सोनार :-**

वाढलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वाढीव म्हणजे आपल्या महानगरपालिकेच्या शाळेचे विद्यार्थी शाळा सोडून जात नाही.

**एन. के. सोनार :-**

हो, सोडून जात नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नक्की.

**एन. के. सोनार :-**

हो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

किती टक्क्याने वाढलेली आहे? आमच्या माहितीप्रमाणे विद्यार्थी शाळा सोडून चालले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझे असे म्हणणे आहे की, ह्या जूनमध्ये पटसंख्या किती होती आणि ह्याच्या अगोदर पटसंख्या जूनमध्ये किती होती? जून २००८ ला पटसंख्या किती होती ते सांगा?

**मा. आयुक्त :-**

ती माहिती आणलेली नाही. त्या पाठीमागच्या वर्षाची आणलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

किती पटसंख्या वाढली? वाढली की कमी झाली?

**एन. के. सोनार :-**

वाढली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्हाला पटसंख्या माहित नाही तर तुम्ही कसे बोलू शकता की वाढली आहे?

**मा. आयुक्त :-**

त्यांना आकडेवारी माहित आहे, पण आणलेली नाही. वाढलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

५ टक्के, १० टक्के किती वाढली आहे?

**मा. आयुक्त :-**

५ टक्के वाढलेली आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, प्रशासकीय अधिकारी इथे आहेत. एक प्रश्न विचारतो, आता शाळा सुरु व्हायला आल्या. यावर्षी तरी मुलांना गणवेश आणि शुज डिस्ट्रीब्युशन झाले का?

**मा. आयुक्त :-**

गणवेश खरेदी केलेले आहेत. शाळेच्या सुरुवातीच्या पहिल्या दिवशी गणवेश देवू.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

बच्चे लोगों को रेनकोट नही देने का क्या?

**मा. आयुक्त :-**

रेनकोट देने का है तो डिसीजन ले लो। आणि ह्याच्या बरोबर वह्या आणि पुस्तके गर्व्हमेंटकडून मिळतात. दप्तर, बुट आणि मोजे हे आपल्याकडून मिळतात.

**अनिल सावंत :-**

रेनकोटचा बजेट किती आहे? मी प्रकरण क्र. ८ च्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००९-१० या मंजूर अर्थसंकल्पात नविन शाळा इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली एक कोटी रक्कमेची तरतुद आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत अर्थसंकल्पातील तरतुदीनूसार दरवर्षी जुन्या कौलारु शाळा इमारती पाडून त्या जागी नविन आर.सी.सी. इमारत बांधण्यात येत आहेत. सद्यस्थितीत राई, मोर्वा, उत्तन, चौक माशाचा पाडा येथील शाळा इमारतींची पूर्नबांधणी करावयाची आहे. माशाचा पाडा व राई येथील शाळागृह इमारतीची पुर्नबांधणी करण्याचे खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | रा.म.क्र.८ माशाचा पाडा शाळागृह इमारत | रु.४९,९१,९६०/- |
| २ | राई शाळागृह इमारत | रु.४८,५०,०००/- |

वरील अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच

३) मिरा मुन्शी कंम्पाउंड येथे शाळा बांधणे.

४) भाईंदर (प) येथे उर्दू शाळा इमारत बांधणे.

५) उत्तन येथे उर्दृ शाळा इमारत बांधणे., या शाळांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. सदर कामांच्या अंदाजपत्रकांना देखिल प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील शाळा इमारती बांधणे कामी सन २००९ - १० या वर्षाच्या अर्थसंकल्पात रू. १.०० कोटीची तरतूद उपलब्ध असून सदर तरतूदीमधून वरील कामे हाती घेण्यात यावी. तथापी अल्पसंख्यांक विभाग व दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत देखिल सदर कामी रकमेची मागणी करून प्राप्त करून घ्यावी. वरील कामांच्या निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, त्यात तसे म्हणाना की, टेंडर काढून कामाला सुरुवात व्हायला जास्त कालावधी जाईल आणि एक करोड रु. असल्यामुळे त्या चारही शाळांचा खर्च होईल. आणि पुढच्या बजेटमध्ये प्रोव्हीजन करु. अल्पसंख्याकांची आणि आदिवासीचीं ग्रॅन्ड वापरावी.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्व सुचनांसह सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शाळा इमारती बांधणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००९-१० या मंजूर अर्थसंकल्पात नविन शाळा इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली एक कोटी रक्कमेची तरतुद आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत अर्थसंकल्पातील तरतुदीनूसार दरवर्षी जुन्या कौलारु शाळा इमारती पाडून त्या जागी नविन आर.सी.सी. इमारत बांधण्यात येत

आहेत. सद्यस्थितीत राई, मोर्वा, उत्तन, चौक माशाचा पाडा येथील शाळा इमारतींची पूर्नबांधणी करावयाची आहे. माशाचा पाडा व राई येथील शाळागृह इमारतीची पुर्नबांधणी करण्याचे खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | रा.म.क्र.८ माशाचा पाडा शाळागृह इमारत | रु.४९,९१,९६०/- |
| २ | राई शाळागृह इमारत | रु.४८,५०,०००/- |

वरील अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच
३) मिरा मुन्शी कंम्पाउंड येथे शाळा बांधणे.
४) भाईंदर (प) येथे उर्दू शाळा इमारत बांधणे.
५) उत्तन येथे उर्दू शाळा इमारत बांधणे., या शाळांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. सदर कामांच्या अंदाजपत्रकांना देखिल प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील शाळा इमारती बांधणे कामी सन २००९ - १० या वर्षाच्या अर्थसंकल्पात रू. १.०० कोटीची तरतूद उपलब्ध असून सदर तरतूदीमधून वरील कामे हाती घेण्यात यावी. तथापी अल्पसंख्यांक विभाग व दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत देखिल सदर कामी रकमेची मागणी करून प्राप्त करून घ्यावी. वरील कामांच्या निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत अनुमोदक :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९, आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शांती नगर सेक्टर ८ येथील ड्रेनेज पंपिंग स्टेशन येथे सबमर्सिबल सिवेज पंप पुरविणे व बसविणे. | रू.१४,४६,०००/- |
| २ | भाईंदर (पुर्व) खारीगांव येथील गटारामधून जाणा-या पाईपलाईन स्थलांतरीत करणे. | रू.१२,३५,६००/- |
| ३ | शांती पार्क मलनिःसारण केद्र येथे सबमर्सिबल सिवेज पंप पुरविणे व बसविणे. | रू.१४,४६,०००/- |
| ४ | शांती नगर सेक्टर ३ येथील ड्रेनेज पंपिंग स्टेशन येथे सबमर्सिबल सिवेज पंप पुरविणे व बसविणे. | रू.१९,७७,०००/- |
| ५ | उत्तन चवळी येथे पोलीस चौकी ते ज्युडिशियल ॲकॅडमीपर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.३८,७८,४००/- |
| ६ | मिरा रोड (पुर्व) येथील नताशा पार्क ते सृष्टी एस.टी.पी. येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.३१,६९,४७३/- |
| ७ | मिरा रोड (पुर्व) येथील सृष्टी एस.टी.पी. ते पुनम सागर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.२९,७७,५४६/- |

उपरोक्त कामांकरीता महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या वार्षिक अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. सबब सदर कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**अनिल सावंत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेबांच्या परवागनीने बोलतो. माझी एक सुचना आहे की, पूनम सागर परिसराची ब-याच वर्षापासून मागणी होती आणि जलवाहिनी टाकणार होते. तिथे पाण्याचा दाब बराच कमी आहे. तर तिथे नविन जलवाहिनी टाकण्याची प्रस्तावित आहे.

**मा. आयुक्त :-**

पूनम सागरला किती इंच पाईप लाईन आहे आणि केव्हा टाकलेली आहे?

**अनिल सावंत :-**

साहेब, तिथे जो प्रॉब्लेम आहे ना तो झोनचा प्रॉब्लम आहे. पाण्याचा प्रेशर नाही.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मला त्याच्यावर थोडसं बोलायचे आहे. आता भाईंदर वेस्टची पाईप लाईन ती जवळ जवळ माझ्या माहितीप्रमाणे १५ ते २० वर्ष जूनी आहे. रेल्वेलाईन खालून ती अक्षरशः गटारातून येते आणि त्याचप्रमाणे लोकसंख्या एवढी झपाट्याने वाढत आहे. तरी त्या पाईप लाईनची कॅपेसिटी तेवढीच आहे म्हणून सभागृहाला माझी अशी विनंती आहे की, तिथे एक लाईन वाढवून भाईंदर वेस्टला बंदोबस्त करावा आणि मागच्या वेळेला आपण रेल्वेला ठराव केलेला त्यांना विनंती वगैरे केलेली आणि हे सगळं झालेले आहे. फक्त ह्या कामाला का उशिर झाला आहे ह्याची माहिती द्या.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, मी ज्यावेळेला होतो, त्यावेळेला मी बदलून घेतलेले होते. फक्त वाढीव पाण्यासाठी आम्ही मागणी केलेली आहे आणि ते मंजूरीचे स्टेजला आहे परंतु ती पाईप लाईन बदललेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, नुसती बदललेली नाही, ती पहिली लहान होती आणि ती मोठी पण झालेली आहे. कारण पूर्वी बिडाची होती.

**मा. आयुक्त :-**

टाकली आहे आणि त्यावर माझ्यावर हे पण होणार होतं.

**मिलन म्हात्रे :-**

ती लहान पाईप लाईन असेल तरी वाद नाही.

**याकुब कुरेशी :-**

पण, आता जी परिस्थिती आहे........

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्याच आठवड्यात अंतिम मंजूरीसाठी रेल्वेकडे एम.जी.पी. कडून डिझाईन पण गेले. त्यांनी तीन वेळा चेंज पण केले होते. त्यांनी सोमवारी रेल्वेकडे हे दिलेले आहे आणि ह्या आठवड्यात त्याला मंजूरी येईल. आणि वरुन लाईन १००० एम.एम. ची एक फुट येणार. रेल्वे पासूनच्या वरुन. तर त्याला ह्या आठवड्यात अंतिम मान्यता मिळण्याची शक्यता आहे. फाटकच्या बाजूने वरुन आपली पाण्याची टाकी, ईस्ट ते भाईंदर वेस्टला जी आता खालून लाईन आहे. त्याच्याऐवजी वरुन १००० एम.एम. ची एफ.ओ.बी. करुन लाईन टाकणार आहे. भविष्यातले उत्तनपर्यंतचे नियोजन करुनच ती लाईन डिवाईड केली.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, प्रकरण ९ जे दिलेले आहे. हे आपण त्यांना हायर करणार आहोत की, स्वतःचे विकत घेणार आहोत.

**शिवाजी बारकुंड :-**

विकत घेणार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

पूरवणे, पंप पूरवणे, पुरवण्याचा खरेदीकरण्याचा हा विषय नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

आर्थिक मंजूरी. पूरवणे व बसवणे. प्रोव्हाईडींग ॲन्ड फिक्सींग.

**अनिल सावंत :-**

प्रोव्हाईडींग प्रॉपर्टी ऑफ म्युनिसिपल.

**मिलन म्हात्रे :-**

सिव्हरेज पंप नविन खरेदी करणे आणि बसविणे अशी शब्दरचना पाहिजे. पूरवण्याचे अर्थ दोन होतात. ती रचना करुन घ्या आणि ठरावात तसे करुन घ्या. पुरवणे म्हणजे उद्या तुम्ही सांगाल की, पुरवायच्या आहेत त्या आणून पुरवल्या.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

बारकुंड साहब, पाणी कितना बढोतरी हुआ है?

**शिवाजी बारकुंड :-**

पाणी साडे ग्यारह एम.एल.डी. तक एम.आय.डी.सी. का पाणी बढ गया है।

**मा. आयुक्त :-**

पाणी पुरवठा विभागाने अर्थ असा घेतला की, डिपार्टमेंटला तुम्ही देणार आणि ते बसवणार. म्हणजे मंजुरी मिळाल्याशिवाय ते मिळणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मंजुरी मिळाली तर ते बोलतील ना......

**मा. आयुक्त :-**

ऑथोरीटीने मंजुर केले की खरेदी करा. म्हणजेच तुमच्याकडून पुरवठा.

**मिलन म्हात्रे :-**

उद्या तुम्हीच काय बोलणार. पुरवणे बोललेले आहे, लिहलेले आहे म्हणजे आम्ही टेंडर काढणार.

**प्रकरण क्र. ९ :-**

आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १३ :-**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शांती नगर सेक्टर ८ येथील ड्रेनेज पंपिंग स्टेशन येथे सबमर्सिबल सिवेज पंप पुरविणे व बसविणे. | रू.१४,४६,०००/- |
| २ | भाईंदर (पुर्व) खारीगांव येथील गटारामधून जाणाऱ्या पाईपलाईन स्थलांतरीत करणे. | रू.१२,३५,६००/- |
| ३ | शांती पार्क मलनिःसारण केद्र येथे सबमर्सिबल सिवेज पंप पुरविणे व बसविणे. | रू.१४,४६,०००/- |
| ४ | शांती नगर सेक्टर ३ येथील ड्रेनेज पंपिंग स्टेशन येथे सबमर्सिबल सिवेज पंप पुरविणे व बसविणे. | रू.१९,७७,०००/- |
| ५ | उत्तन चवळी येथे पोलीस चौकी ते ज्युडिशियल ॲकेडमीपर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.३८,७८,४००/- |
| ६ | मिरा रोड (पुर्व) येथील नताशा पार्क ते सृष्टी एस.टी.पी. येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.३१,६९,४७३/- |
| ७ | मिरा रोड (पुर्व) येथील सृष्टी एस.टी.पी. ते पुनम सागर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.२९,७७,५४६/- |

उपरोक्त कामांकरीता महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या वार्षिक अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. सबब सदर कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. अनिल दिवाकर सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. १४/०५/२००९ रोजीच्या दै. लोकमत व दै. हमारा महानगर या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकीत जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदा दिनांक २२/०५/२००९ रोजी उघडण्यात आल्या. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स (LA- Class) आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष ISO/B.S स्टॅंडर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.**

| व्यास | मे. विंध्या ट्रेडर्स | मे. केशरी ॲन्ड कंपनी | मे. कपिलांश धातु उद्योग प्रा.लि. |
|---|---|---|---|
| | निविदेचा दर (रू.) | निविदेचा दर (रू.) | निविदेचा दर (रू.) |
| १०० मि.मी | १४३३/- | १४५०/- | १४६०/- |
| १५० मि.मी | २२२५/- | २३००/- | २२६५/- |
| २०० मि.मी | ३२३०/- | ३३२०/- | ३२७०/- |
| २५० मि.मि | ४१५७/- | ४३५०/- | ४१९३/- |
| ३०० मि.मि | ५५९०/- | ५७२०/- | ५६००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| **३५० मि.मि** | **७८१२/-** | **८२३५/-** | **७९२३/-** |
| **४०० मि.मि** | **९२५०/-** | **९४३०/-** | **९४५०/-** |
| **४५० मि.मि** | **१११००/-** | **११४००/-** | **११२७०/-** |
| **५०० मि.मि** | **१३०५०/-** | **१३३५०/-** | **१३३६५/-** |

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विभागांमध्ये आवश्यकतेनुसार जलवाहिन्या अंथरणेसाठी पाईप पुरवणेबाबत स्पर्धात्मक निविदा (दर) मागविण्यात आलेले आहेत. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची मे. विंध्या ट्रेडर्स यांची आहे. त्यांनी सादर केलेले दर वाजवी व संयुक्तीक आहेत. सबब मे. विंध्या ट्रेडर्स यांची लघुत्तम दराची निविदा मंजूर करणेस व या कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मागच्या विषयामध्ये हे जे ज्युडीशीयल ॲकेडमी पर्यंत आपली एक पाईप लाईन ऑलरेडी आहे ना.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, नाही. ४ ची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

४ ची आहे का? ती बदलून मोठी करणार का? ती काढून घेणार.

**शिवाजी बारकुंड :-**

ती राहणार आहे.

**टेरी परेरा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानंमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १० :-**

निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १४ :-**

दि. १४/०५/२००९ रोजीच्या दै. लोकमत व दै. हमारा महानगर या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकीत जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदा दिनांक २२/०५/२००९ रोजी उघडण्यात आल्या. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स (LA- Class) आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष ISO/B.S स्टॅंडर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.**

| **व्यास** | **मे. विंध्या ट्रेडर्स** | **मे. केशरी ॲन्ड कंपनी** | **मे. कपिलांश धातु उद्योग प्रा.लि.** |
|---|---|---|---|
| | **निविदेचा दर (रू.)** | **निविदेचा दर (रू.)** | **निविदेचा दर (रू.)** |
| **१०० मि.मी** | **१४३३/-** | **१४५०/-** | **१४६०/-** |
| **१५० मि.मी** | **२२२५/-** | **२३००/-** | **२२६५/-** |
| **२०० मि.मी** | **३२३०/-** | **३३२०/-** | **३२७०/-** |
| **२५० मि.मि** | **४१५७/-** | **४३५०/-** | **४१९३/-** |
| **३०० मि.मि** | **५५९०/-** | **५७२०/-** | **५६००/-** |
| **३५० मि.मि** | **७८१२/-** | **८२३५/-** | **७९२३/-** |
| **४०० मि.मि** | **९२५०/-** | **९४३०/-** | **९४५०/-** |
| **४५० मि.मि** | **१११००/-** | **११४००/-** | **११२७०/-** |
| **५०० मि.मि** | **१३०५०/-** | **१३३५०/-** | **१३३६५/-** |

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विभागांमध्ये आवश्यकतेनुसार जलवाहिन्या अंथरणेसाठी पाईप पुरवणेबाबत स्पर्धात्मक निविदा (दर) मागविण्यात आलेले आहेत. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची मे. विंध्या ट्रेडर्स यांची आहे. त्यांनी सादर केलेले दर वाजवी व संयुक्तीक आहेत. सबब मे. विंध्या ट्रेडर्स यांची लघुत्तम दराची निविदा मंजूर करणेस व या कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदक :- श्री. टेरी परेरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, जंतुनाशके व किटकनाशके मंजुर दराने खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ११ मध्ये पहिल्या वेळेला बायर इंडियाने डेमो दिला होता. त्याच्यामध्ये माशांच औषध दिलं होते. खाद्य पदार्थावर बसतात त्या. त्याला स्प्रे ही येतो. आणि ग्रॅन्युअल जे आता आपल्या इथे टिवरांची झाडे वगैरे आहेत तिकउे भरपूर प्रमाणात मच्छर येते. तर त्या माशांचा आणि ग्रॅन्युअलचा उल्लेख नाही. कारण पावसाळा जवळ आला. आपण त्यावेळेला ग्रॅन्युअल मागवल होत.

**अजित पाटील :-**

ह्याच्यामध्ये ग्रॅन्युअलचा प्रस्ताव नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आता पावसाळा जवळ आला. माशांच औषध पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक औषध आणल्यानंतर सर्व सदस्यांसमोर माशा, मुंग्या आणि मच्छर हे सगळं मारुन दाखवायचे. हे जरी मस्करीवर घेतले तरीही वस्तुस्थिती खरी आहे. औषधाचे जे बॅरल येईल. मुंग्या, मच्छर आणि माशा हे मेल्यानंतर सभागृहात आणून दाखवायचे. नंतरच मारायला सुरुवात करायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमचे जे कर्मचारी आहेत ना, ते औषधामध्ये पाणी जास्त मिक्स करतात. त्यामुळे त्याचा रिझल्ट येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या औषधाच्या फवारणीमध्ये थोड नियोजन करायला लागेल. कारण मगाशी पाटील साहेब जे बोलले. जी औषध फवारणी करायला माणसं जातात त्यामध्ये औषधाचे जे प्रमाण आहे ते जे मुकादम आहे किंवा ठेकेदार आहेत. एवढी महागडी औषधे आहेत, त्याचे प्रमाणच कमी असते. माझं म्हणण असे आहे की, आपण जेव्हा डिस्ट्रीब्युट करतो त्यावेळेला बॅरलमध्ये तिकडे आपल्या मेन ऑफीसला टाकून त्यांना सप्लाय करायचा. म्हणजे त्यांनी टाकायचा प्रश्नच येत नाही.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो आरोग्याचा विषय आहे ना डास निर्मुलन करोडो रु. आपण खर्च करतो. डासाचे निर्मुलन होत नाही. हा प्रॉब्लेम का होतो? आपले जे अधिकारी आहेत ते ए.सी. केबिनच्या बाहेर पडत नाहीत. एरियामध्ये काय चालले आहे त्यांना त्याची कल्पना नाही. त्यामुळे कुठच्या विभागामध्ये जास्त मच्छर आहे? कुठच्या विभागामध्ये फवारणी बरोबर होते की नाही? सध्या आता फॉगींग बंद आहे. किती दिवस झाले फॉगींग बंद आहे? आपण त्याच्यासाठी करोडो रुपये खर्च केले.

**शानु गोहिल :-**

आमच्या इथे चालु आहे.

**अनिल सावंत :-**

आमच्या येथे बंद आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरारोडला चालु असेल ना.

**अनिल सावंत :-**

मिरारोडला बंद आहे.

**शानु गोहिल :-**

आमच्या येथे चालु आहे. ३,४,५ व ६ चालु आहे.

**अजित पाटील :-**

मिरारोडला चालु नाही. मी सांगितले ना.

**अनिल सावंत :-**

का मिरारोडच्या माणसांना मच्छर चावत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, औषध पण गटारात मारत नाही आणि फॉगींग पण होत नाही.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, आता पाटील साहेब बोलले की, मिरारोडला बंद आहे. म्हणजे मिरारोडच्या लोकांना मच्छर चावत नाही.

**अजित पाटील :-**

६-७ महिने झाले बंद आहे.

**मा. आयुक्त :-**

सहा महिन्यात मशिन बंद कसे पडले? कंपनीवाला कोण आहे?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मागच्या मिटींगमध्ये आयुक्तांच्या ज्या सगळ्या इन्स्ट्रक्शन होत्या. जाधव साहेबांच्या इन्स्ट्रक्शन होत्या. त्या कंपनीवाल्याला बोलवा. त्याच्याकडून मेन्टेनन्स करुन घ्या. मागचे इतिवृत्तांत उघडून वाचा.

**मा. आयुक्त :-**

त्याचे डिपॉझीट ठेवले का? किती वर्षाची गॅरेन्टी आहे. मग, सहा महिन्यानतर तुटले.

**अजित पाटील :-**

रिपेअरींग करण्यासाठी बोलवलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याला नोटीस द्या आणि बोलावून घ्या. नाहीतर सर्व कॉर्पोरेशनला आणि सर्व नगरपालिकांना आम्ही कळवू की, तुमचे मशिन असे आहे. त्याचा नोटीसमध्ये असे कळवा.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या सहीने नोटीस पाठवा ना.

**मा. आयुक्त :-**

माझ्या सहीनेच नोटीस पाठवणार ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्यातली शब्दरचना काय आहे ते वाचून मगच सही करा.

**अनिल सावंत :-**

पाटील साहेब, २० लाख रु. मधले आता औषधे किती शिल्लक आहेत? तुम्ही जे २ महिन्यामध्ये २० लाख रु. खर्च केले. त्यातले किती औषधे शिल्लक आहेत?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंत साहेब, तुम्हाला विरोध नोंदवायचा असेल तर विरोध नोंदवून घेतो. जास्त चर्चा नका करु. चर्चा झालेली आहे.

**अनिल सावंत :-**

चर्चा तर होवू द्या ना. अशी कशी चर्चा झाली? चर्चा व्यवस्थित होवू द्या ना. ह्या शहराच्या हितासाठीच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आता आपल्या अधिकाऱ्यांनी विषय आणला. फॅन्टन खरेदी करायचा. ॲक्च्युअली हे जे टेंडर निघाले आहे ते २००८-०९ साली आणि हे आर्थिक वर्ष चालु आहे. २००९-१० साली म्हणजे मागच्या वर्षीच्या रेटवरती ह्या वर्षी का मागवतात. ह्या वर्षी टेंडर का नाही काढले? त्याच्यानंतर फॅन्टन आहे हे आपल्या आपल्या गर्व्हमेंट ऑफ हेल्थ डिपार्टमेंटने बॅन्ड केलेले आहे. ह्याचा रिझल्ट येत नाही. टेक्नीकल नॅशनल वेक्टर बॅन्ड धीस इज कंट्रोल प्रोग्राम ऑफ गर्व्हमेंट ऑफ इंडिया. त्यांच्या कमिटीने डिसीजन घेतलेला आहे आणि हे आपल्या अधिकाऱ्यांना माहित आहे. तरीसुध्दा हे अधिकारी .....

मा. आयुक्त :-

बॅन्ड घेतलेले नव्हते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्हाला हे पेपर दिलेले नाही का? ठिक आहे मी तुम्हाला वाचून दाखवतो. अजेंडा नं. ४ टॅग कमिटी उसका मिनिंग है, Technical Adviser committee of Indian, ajenda no.5. The tag in the meeting held on 20 February 2008 recommended that the program should take of the issue on M.R. to conduct more studies in urban areas to determine for the subject build the study of deputy confection by the N.M.R. an areas of Banglor railly and nadiyar evarance from the studies showing function proceed less impact on mosquito monthly in field at the an why bedishies recommended doses of the 100 ML and alted use of lakses an the areas. साहेब, याचा रिझल्ट एकदम कमी येतो. म्हणून हे लोक गर्व्हमेंट इंडिया रेकमन्ड करत नाही. यांनी सगळ्या आपल्या बीएमसीला......

**मा. आयक्त :-**

ह्याचा अर्थ की, बॅन्ड केलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही रिझर्ल्टच देत नाही.

**अनिल सावंत :-**

जर रिझर्ल्ट नसेल तर करोडो रुपये घालून फायदा काय?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, गर्व्हमेंट ऑफ इंडियाने नेव्हीला सुध्दा सांगितलेले आहे. नेव्हीने विचारले की, आम्ही कुठले लावासेस युज केले पाहिजे. ह्याच्यामध्ये फॅन्टनचे नावच नाही. त्याच्यामध्ये डी.जी.एफ.एम.एस. ॲन्ड ब्लॉक नेव्ह दिल्ली. नवी दिल्लीला पण कळवलेले आहे की, ह्याच्यामध्ये फॅन्टनच नावच नाही. त्याच्यानंतर बी.एम.सी.ला सुध्दा कळवले आहे. बी.एम.सी. ने सुध्दा विचारले आहे तर बी.एम.सी.ला सुध्दा कळवले आहे की, फॅन्टनचा रिझर्ल्ट नाही आहे. हे सगळे पेपर ह्यांना दिले होते. परंतु, ह्यांनी गेल्या वर्षीची आर्थिक निविदा तीच कन्टीन्यु केली. त्यांनी टेंडर का नाही मागवले?

**संदिप शिंदे :-**

फॅन्टूयन जे आहे ते फॅन्टयनला रजिस्टन आलेले आहे. तुम्ही जे पत्र वाचलेले आहे त्याला रजिस्टन आलेले आहे. जो ॲप्रोप्रोव्हाईड बेस कंपनीने केलेला असतो. म्हणून त्यांना ते स्टॉप करायला सांगितले. तेवढे रिझल्ट त्यावेळेला त्यांचे टेस्ट रिझल्ट आल्यानंतर त्यांनी परत बेसीक वाढवून पुन्हा करायला सांगितले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे गेल्यावर्षीचे म्हणजे २००८ चे आहे.

**संदिप शिंदे :-**

बरोबर आहे. साहेब त्याला रजिस्टन आले. बॅन्ड केलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रजिस्टन आले आहे ना. म्हणजे त्या औषधाचा उपयोग नाही ना.

**संदिप शिंदे :-**

त्याला एकसारखं युज करुन जे आळ्या असतात ते रेजिस्ट करतात. त्याच्याने त्याची जी कॉन्टीटी होती, तो बेस जो आपण डायजेशनला वापरतो तो त्यांनी वाढवायला सांगितलेला आहे. त्याच्यानंतर आपल्याकडे बाकीचे पत्र पण आहे. त्याच्यात पण त्यांनी रेकमन्ड केलेले आहे. जो ॲप्रोप्रोव्हाईड डोस आहे तो वाढवून वापरायचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग, ह्यांना का नाही सांगितले?

**जुबेर इनामदार :-**

शिंदे साहेब, डिस्ट्रीक मलेरीया जे अधिकारी आहेत त्यांनी तुम्हाला कुठले रेकमन्ड केले आहे?

**संदिप शिंदे :-**

ते बी.एम.ए. आहे त्यांना जसे योग्य वाटते ते.....

**जुबेर इनामदार :-**

तरीसुध्दा त्यांनी कुठले रेकमेन्डेड केले. केमिकल्सचे कंपनीवाल्यांकडे असते. पॅरासिनमॉल जो आहे ते बरेच कंपनी वापरते. तसे केमिकल आहे. बायर ही बनवत असेल. त्यामुळे मला सांगा तुम्हाला डिस्ट्रीक मलेरीया डिपार्टमेंटने कुठले केमिकल वापरायला सांगितले.

**संदिप शिंदे :-**

एम.एल.ओ. वापरायला सांगितले.

**जुबेर इनामदार :-**

एम.एल.ओ. उपलब्ध होत नाही. मग, दुसरे काय? स्प्रेईंग करता काय? एम.एल.ओ. इज नॉट इन्सेन्टीव्ह साईड.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब, आपण जे घ्यायचे नाही असे तुम्ही सांगितले. त्याच्या बदली दुसरे कुठले घ्यायचे. सल्ला देणाऱ्या माणसाने त्याचे औषध घ्यायचे रेकमन्ड केले असेल ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

केले आहे ना.

**मा. आयुक्त :-**

मग ते सांगा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रिमफोर्स मेन्टल ५० टक्के इ.सी., बी.टी.आय.....

**अनिल सावंत :-**

साहेब दुसरा एक मुद्दा आहे. गेल्या वर्षाचे टेंडर अजून पर्यंत चाललेले आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्याचे निर्षण दिल्यानंतर त्याचे रिप्लाय मी देणार आहे.

**संदिप शिंदे :-**

साहेब, हा जो वॅक्टोरेट दिलाा आहे, हे वॅक्टोरेट आपण आधी स्पोर फॉर्म मध्ये असते. पाण्यात जेव्हा तो मिक्स होतो त्याच्या आतमध्ये जे बेक्टेरिया असते, ते २५ डीग्रीपर्यंत सस्टेन्ट होतात. पाण्याचे टेम्प्रेचर वाढले की, बॅक्टेरीया मरुन जातात. त्याच्यामुळे ते येवढं युज होत नाही.

**मा. आयुक्त :-**

गव्हर्मेंट ऑफ इंडियाने तर हेच सुचवले आहे.

**संदिप शिंदे :-**

त्यांनी सुचवले तेच मी सांगितले.

**संदिप शिंदे :-**

सिरोफाया ४४०.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे तुम्ही विचारा की, लारवी साठी दुसरे कुठले औषध वापरले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

त्याबाबत विचारु मग घेउ. हे सेंट्रल गव्हर्मेंटने रेकमन्ड केलेले आहे. दि. ०२/१२/२००८ ला आणि तुमचे पत्र आहे दि. २४/०३/२००९ चे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे पण पत्र २००८ चे आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, खरेदी करायचे की नाही, हा गव्हर्मेंटकडून सल्ला घेउ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गव्हर्मेंटचे पत्र आहे.

**जुबेर इनामदार :-**

सल्ला घ्या आणि मग हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, मागच्या वेळेला फार स्पर्धा होवून टेंडर आलेले होते आणि या दरामध्ये कुठल्याच महापालिका आणि नगरपालिकेमध्ये या दरामध्ये औषध मिळत नाही. त्यामुळे स्पर्धा जास्त झाली होती. आता जर टेअंडर मागवले तर जास्त दराने येईल. आणि त्याच्याकडून आपण पुन्हा २ टक्के सुट करुन घेतली. या कॉम्पीटीशनच्या दरामध्ये आणि ही औषध व्यवस्थीत आहे की नाही हे बघूनच तुम्ही खरेदी करण्याबाबत त्या लोकांना सांगितलेलं की, माशा, मुंग्या, कॉकरोज, मच्छर हे सगळं टोटल आणून तुमच्यासमोर दाखवून ते युज करा आणि तुम्ही परवानगी दिल्यानंतरच हे युज करणार आहे. पण आता टेंडर काढल्यानंतर तर ह्या पेक्षा जास्त दराने आले असते. कारण बाकीच्या महानगरपालिकेची चौकशी केली तर या पेक्षा जास्त दराचे आहे. हे कमी दराचे आले आहे म्हणून आपण मुदतवाढीची शिफारस केली आहे. आणि दुसरा महत्वाचा मुद्दा यांनी सांगितला की, प्रत्येक माणसाचं आणि निर्सगाची पचवायची ताकद निर्माण झाली की, कंपनीवाले औषध चेंज करतात.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, ह्या ज्या मोठमोठ्या कंपन्या आहेत आणि तुमचा पर्टीक्युलर एरिया घेतात, हायर करतात आणि तुम्हाला फ्री ऑफ चार्ज एक्सपेरिमेन्ट करुन देतात की, हे मच्छर मारुन आम्ही दाखवतो. गुड नाईट आहे, गोदरेज आहे, बायर इंडिया आहे. तशा प्रकारे ऑफीसरांना वर्कआउट करायला सांगा ना. कंपन्यांना ॲप्रॉच करायला सांगा ना. तिथे जास्त मच्छर आहे. तो भाग त्यांना द्या. या पावसाळ्यामध्ये एक्सपेरिमेन्ट करा.

**मा. आयुक्त :-**

जास्त आणि कमीचे नसते. ६ हजार कि.मी. चा वेग असतो.

**अनिल सावंत :-**

जिथे नाले असतात, डबके असतात तिथे.

**मा. आयुक्त :-**

वेग आहे. पूर्वी आपण चूना आणि गॅमेजीन घेवून पावडर मारत होतो. गॅमेजीन मारलं तर दिसत नव्हत. म्हणून लोक शिव्या द्यायचे. म्हणून त्यात चूना मिक्स करुन मारायला लागलो. हे जे फवारणी करणे किंवा धूर फेकणे हे लोकांना दिसण्यासाठी आहे. प्रत्यक्षात त्याचा वापर काय होत नाही. कारण ज्या ठिकाणी तुम्ही औषध फवारणी करणार किंवा धुर मारणार. त्या ठिकाणचे मच्छर निघून जाणार. आणि त्याचे औषध गेल्यानंतर ते मच्छर तिथेच येणार. त्यामुळे आपल्याला अटॅक करायला पाहिजे की, जिथे उत्पत्ती होते डासांची, अळीची उत्पत्ती कुठे होते संडासाच्या टाकीत, गटारामध्ये, साचलेल्या पाण्यात मुळ उत्पत्ती थांबायला पाहिजे. तरच तुम्हाला डास दिसणार नाही. आता २-३ दिवसामध्ये जाळ्यांचे टेंडर येणार आहे. प्रत्येक संडासाच्या टाकीमध्ये १ लीटर ऑईल ओतणार आहे. आणि वर जाळी बांधणार आहेत. त्यानंतर गटारामध्ये

आणि तलावामध्ये ऑईल ओतणार आहे. म्हणजे पाण्यावर एक थर देणार आहे. त्यामुळे अळी उत्पत्ती थांबवल्यानंतर डास आपोआप थांबतील.

**मिलन म्हात्रे :-**

ज्या मॅनग्रोमध्ये गवत आहे, गवतामध्ये सगळे जे जमा होते.

**मा. आयुक्त :-**

साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु उत्पत्ती झाल्यानंतर आडवाटेला ते जावून थांबतात.

**मिलन म्हात्रे :-**

मॅनग्रोच्या तळाशी ती सगळी उत्पत्ती होते आणि त्या गावताच्या तळाशी उत्पत्ती होते. म्हणजे तिथे तुम्हाला ग्रॅन्युअल वापरायला लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**मा. आयुक्त :-**

आता ठरावामध्ये ते येउ द्या. आणि तुमच्याकडून चेक झाल्यानंतर मंजुरी द्या नाहीतर देउ नका.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही म्हणाला की, कमी दराने सप्लाय करतात तर कुठे ही कमी दराने सप्लाय करत नाही. मग, त्याला परवडते कसे? नक्की तोच माल देतो ना तो.

**मा. आयुक्त :-**

परवडते म्हणजे तो कंपनीचा मेन डिलर आहे. आणि बाकीचे जे पुरवतात ते सब डीलर आहेत.

**अनिल सावंत :-**

२० लाख रू. मधला आता स्टॉक किती उरला आहे?

**मा. सभापती :-**

जर कोणाला विरोध नोंदवायचा असेल तर सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, औषध मागवले बरोबर आहे. पण, आमची जी शंका आहे ती तर दुर झाली पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला त्या विषयाचा दुर करणार ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमचा डिसीजन काय आहे.

**मा. आयुक्त :-**

ते खरेदी करण्यापुर्वी आम्ही खात्री करू आणि जर तुमच्या मताप्रमाणे असेल तर खरेदी करणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सब्जेक्ट टू कंडीशन.

**टेरी परेरा :-**

विषया संदर्भात मा. आयुक्त सो., यांचा गोषवारा वाचन करण्यात आला.

महापालिकेला डास निर्मुलन करण्यासाठी ६ महिन्याकरीता खालील अळी नाशके किटक नाशकाची आवश्यकता आहे.

| क्र. | औषधांचे नाव | आवश्यक अंदाजीत परिमाण |
|---|---|---|
| | FENTHION 82.5 E.C (बायर क्रॉप्स सायन्स) | १२०० लिटर |
| | CYFLUTHRIN 050% (बायर क्रॉप्स सायन्स) | ८०० लिटर |
| | DELTAMEHTRIN ULV 1.25% (बायर क्रॉप्स सायन्स) | २०० लिटर |

महापालिकेने सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये वरील अळी नाशके मा. स्थायी समिती सभा दि. १९/१२/२००८, ठराव क्र. ९० अन्वये खालील दराने मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांचेकडून खरेदी केलेली आहेत.

| क्र. | औषधाचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | LARVICIDE (अळी नाशके)<br>FENTHION (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७७९.८० प्रती लिटर |
| २ | ADULTICIDE (डास नाशके )<br>CYFLUTHRIN 050% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १९००/- प्रती लिटर |
| ३ | FOR FOGGING (धुकीकरण)<br>DELTAMEHTRIN ULV 1.25% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७००/- प्रती लिटर |

मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन हे बायर क्रॉप्स सायन्स या नामांकित कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. वरील किटक नाशके, अळी नाशके मुदतीत पुरवठा केलेला आहे. किटक नाशक व अळी नाशकाचा परिणाम चांगला झाला असून डासांचा प्रादुर्भाव काही प्रमाणात कमी झालेला आहे. ही किटक नाशके, अळी नाशके

डासांचा प्रादुर्भाव कमी करण्यास उपयुक्त आहेत. मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांनी सदर किटक नाशके, अळी नाशके जुलै २००९ पुर्वी खरेदी केल्यासट खरेदीच्या एकुण परिमाणावर २ टक्के इतका माल मोफत देणार आहेत.

मा. स्थायी समितीने वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या दरानुसार चालु वर्षी सदरची किटक नाशके, अळी नाशके खरेदी केल्यास महापालिकेला मागील वर्षीचाच दर द्यावा लागणार आहे. त्यावर कंपनी खरेदी परिमाणाच्या २ टक्के इतका माल मोफत देणार असल्याने महापालिकेला त्याचा फायदा होणार आहे. तरी सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या सहा महिन्या करीता मा. स्थायी समिती सभा दि.१९/१२/२००८, ठराव क्र. ९० अन्वये मंजूर केलेल्या खालील दरानुसार खालीलप्रमाणे बायर क्रॉप्स सायन्स या नामांकित कंपनीची किटक नाशके, अळी नाशके खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| क्र. | औषधाचे नाव | दर | आवश्यक परीमाण |
|---|---|---|---|
| १ | LARVICIDE (अळी नाशके)<br>FENTHION (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७७९.८०<br>प्रती लिटर | १२०० लिटर |
| २ | ADULTICIDE (डास नाशके )<br>CYFLUTHRIN 050% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १९००/-<br>प्रती लिटर | ८०० लिटर |
| ३ | FOR FOGGING (धुकीकरण)<br>DELTAMEHTRIN ULV 1.25% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७००/-<br>प्रती लिटर | २०० लिटर |

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही ती सुचना केली ना की, हे जे बोलले की, त्या कंपन्यामध्ये जावून जो एरिया त्यांना आपल्याला द्यायचा आहे ती सुचना त्याच्यात ॲड करून घ्या ना.

**अनिल सावंत :-**

४० लाख रू. की, २० लाख रू.

**जुबेर इनामदार :-**

४० लाख रू. चे केलेले आहे मागणी काय ४० लाख रू. ची केली का? तुम्ही पावसामध्ये कुठे फवारणी करणार आहे?

**अनिल सावंत :-**

साहेब, तुम्ही त्याला नंतर मान्यता द्या ना.

**जुबेर इनामदार :-**

जेव्हा पेपर घ्याना बाकी लागेल तेव्हा पण आम्ही त्याचा रिझल्ट बघाना.

**अनिल सावंत :-**

३ महिन्यांनी मान्यता घ्याना आम्ही कुठे नाही म्हणतो. २० लाख रू. करा.

**जुबेर इनामदार :-**

२० लाख रू. चा ठराव करा. आलेल्या औषधाचा रिझल्ट बघा. मग करा.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. आधी खात्री करून घेतो.

**प्रकरण क्र. ११ :-**

जंतुनाशके व किटकनाशके मंजुर दराने खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १५ :-**

विषया संदर्भात मा. आयुक्त सो., यांचा गोषवारा वाचन करण्यात आला.

महापालिकेला डास निर्मुलन करण्यासाठी ६ महिन्याकरीता खालील अळी नाशके किटक नाशकाची आवश्यकता आहे.

| क्र. | औषधांचे नाव | आवश्यक अंदाजीत परिमाण |
|---|---|---|
| | FENTHION 82.5 E.C (बायर क्रॉप्स सायन्स) | १२०० लिटर |
| | CYFLUTHRIN 050% (बायर क्रॉप्स सायन्स) | ८०० लिटर |
| | DELTAMEHTRIN ULV 1.25% (बायर क्रॉप्स सायन्स) | २०० लिटर |

महापालिकेने सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये वरील अळी नाशके मा. स्थायी समिती सभा दि. १९/१२/२००८, ठराव क्र. ९० अन्वये खालील दराने मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांचेकडून खरेदी केलेली आहेत.

| क्र. | औषधाचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | LARVICIDE (अळी नाशके)<br>FENTHION (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७७९.८० प्रती लिटर |
| २ | ADULTICIDE (डास नाशके )<br>CYFLUTHRIN 050% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १९००/- प्रती लिटर |

| | | |
|---|---|---|
| ३ | FOR FOGGING (धुकीकरण)<br>DELTAMEHTRIN ULV 1.25% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७००/- प्रती लिटर |

मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन हे बायर क्रॉप्स सायन्स या नामांकित कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. वरील किटक नाशके, अळी नाशके मुदतीत पुरवठा केलेला आहे. किटक नाशक व अळी नाशकाचा परिणाम चांगला झाला असून डासांचा प्रादुर्भाव काही प्रमाणात कमी झालेला आहे. ही किटक नाशके, अळी नाशके डासांचा प्रादुर्भाव कमी करण्यास उपयुक्त आहेत. मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांनी सदर किटक नाशके, अळी नाशके जुलै २००९ पुर्वी खरेदी केल्यासट खरेदीच्या एकुण परिमाणावर २ टक्के इतका माल मोफत देणार आहेत.

मा. स्थायी समितीने वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या दरानुसार चालु वर्षी सदरची किटक नाशके, अळी नाशके खरेदी केल्यास महापालिकेला मागील वर्षीचाच दर द्यावा लागणार आहे. त्यावर कंपनी खरेदी परिमाणाच्या २ टक्के इतका माल मोफत देणार असल्याने महापालिकेला त्याचा फायदा होणार आहे. तरी सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या सहा महिन्या करीता मा. स्थायी समिती सभा दि.१९/१२/२००८, ठराव क्र. ९० अन्वये मंजूर केलेल्या खालील दरानुसार खालीलप्रमाणे बायर क्रॉप्स सायन्स या नामांकित कंपनीची किटक नाशके, अळी नाशके खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| क्र. | औषधाचे नाव | दर | आवश्यक परीमाण |
|---|---|---|---|
| १ | LARVICIDE (अळी नाशके)<br>FENTHION (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७७९.८०<br>प्रती लिटर | १२०० लिटर |
| २ | ADULTICIDE (डास नाशके )<br>CYFLUTHRIN 050% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १९००/-<br>प्रती लिटर | ८०० लिटर |
| ३ | FOR FOGGING (धुकीकरण)<br>DELTAMEHTRIN ULV 1.25% (बायर क्रॉप्स सायन्स) | रु. १७००/-<br>प्रती लिटर | २०० लिटर |

**सुचक :- श्री. टेरी परेरा** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानात कुस्ती सरावाकरीता शेड बांधून जागा भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आता आपला जो नविन स्टेडीयमचा आराखडा आहे. या अगोदर आम्ही काही प्रस्ताव पाठवले तर ते नाकारले. माझा प्रस्ताव असा होता. माझे पत्र आयुक्त कार्यालयात सीटी इंजिनियर ह्यांच्याकडे दिलेले आहे. के.डी.एम.सी. मध्ये तोफा वगैरे देतात. के.डी.एम.सी. मिलेक्ट्रीकडून लावलेला आहे. त्या पत्रावर अजुन मला उत्तर नाही आलेले. म्हणजे ती जागा तुम्ही कुठे कुठे देता. त्याच्यातली कमी किती होणार? एक्सपान्डीशनची देतात. त्यांना कुठे देणार आहात. तर मध्यंतरी दोन शेड बांधलेले आहेत. मला त्याचा विरोध नाही. पण, प्लानिंग करा आणि माझे पत्र जर तुमच्याकडे आहे. मिलेक्ट्री तुम्हाला फुकट देते. फक्त एवढेच आहे की, त्याला व्यवस्थित पेन्ट वगैरे करून त्यांच्या ज्या त्याच्यावरती भावना आहेत. आपल्या शहरामध्ये हा प्रोजेक्ट कुठेच राबवला नाही. ६ महिने झाले पत्र दिलेले आहे. अडचण काय असेल तर सांगा. माझ्या पत्रावर ॲक्शन घेउन त्यांच्या डिपार्टमेंटला कळवल का? नसेल तर मला सांगा मी तुम्हाला मदत करतो. बांधकाम विभागाला पत्र दिलेले आहे. अडचण काय होती मला सांगा ठरावीक कुठल्यातरी विशिष्ठ राजकीय पक्षाच्या पत्रावरती तुम्ही प्रायोरिटी बेसवर घेउन येता. शहराच्या नो लॉस नो प्रॉफिट वर ती वस्तु मिळते. आज इकडे तुम्ही १६ लाख रू. चा फिगर दिलेला आहे. हे काल परवा आलेले पत्र असेल. ह्याचे पत्र कधी आलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या पत्राचा विषय स्थायी समितीमध्ये होता का?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही समजलात नाही. माझे जे पत्र तुमच्या कुठल्या डिपार्टमेंटला गेले हे तर उत्तर द्या की, माझी मागणी अयोग्य आहे. किंवा रास्त नाही. खर्चाला परवडणारी नाही. किंवा तुम्हाला काही प्रॉब्लेम आहे. तर माझे तसे उत्तर द्याना. मला एक सांगा जॉगिंग ट्रॅकचा तीन साडे तीन वर्ष प्रस्ताव आला आणि ते आता

गेल्या वेळेला झाला. जागा नाही अशी उत्तरे येतात. तर त्या प्रश्नात तुम्ही आम्हाला ही उत्तर देतात. तर हे प्रोजेक्ट बसवताना ह्याच्याकरिता तुम्ही कुठे जागा दिले.

**मा. आयुक्त :-**

तुमच्याकडे हा विषय विचारात आणला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा विचारच चालला आहे ना.

**मा. आयुक्त :-**

विचारात आणला आहे. अजुन केला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

विचार चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

पाण्याच्या टाकीच्या बाजुला आहे.

**मा. सभापती :-**

नाही परवानगी येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नुसता विरोध करून नाही चालत. तुम्ही काहीतरी पॉईंट घ्या ना. जरा रेकॉर्डवर आणा. आता शिवाजीचा पुतळा एन्ट्रीला आहे. मी माझ्या लेटरमध्ये स्पॉट्स दिले. मिलेक्ट्री कडून प्रत्येक चौका चौकामध्ये काहीतरी त्यांचे आयोग सुदरशी कलर करून लावलेले आहे. आज त्या शहराची भुषण आहे. मी प्रत्येक स्पॉट्स दिले एकाही पत्राचे उत्तर अजुन मला आलेले नाही. बर नसेल परवडत तर मला उत्तर द्या ना.

**मा. आयुक्त :-**

सर्व खाते प्रमुखांना आदेश देण्यात येत आहे की, सर्व सन्मा. सदस्यांचे जे पत्र असतील तर त्यांनी त्यांना उत्तरे द्या.

**मिलन म्हात्रे :-**

पण आता ६ महिने त्याचा डीले का झाला? तो प्रस्ताव कुठे ठेवला? त्याच्यासाठी जागा कुठे ठेवले? कारण ती वस्तु तुम्ही कुठे कोपऱ्यात जावून टाकणार नाही. आणि ती झालीच पाहिजे. साहेब, मी सर्व स्पॉट्स दिले आहे.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये सुभाषचंद्र बोस मैदान आहे. आणि असे एकच मैदान आहे की, तिथे मिरा भाईंदर मधले सर्व लोक खेळायला येतात. आज तिथे तुम्ही रविवार किंवा शनिवार बघाल तर तिथे अक्षरशः मारामारी असते. आपल्या महापालिकेचे काहीही नियमावली नाही. कोणाला भाड्याने द्यायचे? तिथे कोण खेळणार आहे. ज्यांची दादागिरी चालते ते तिथे कब्जा करतात. लाखो रूपये खेळपट्टीसाठी महानगरपालिकेने त्याठिकाणी खर्च केलेले आहे. काहीही विघ्नसंतोषाने खेळपट्टी अक्षरशः खोदून टाकतात. त्याच्यावर आपल्याला काहीही कंट्रोल नाही. तर, माझी अशी एक सुचना आहे की, सुभाषचंद्र बोस मैदान हे जे आपण खेळण्यासाठी देवू त्यांची एक प्रॉपर नियमावली तयार करा आणि ॲथोरिटी, प्रायोरिटी बेसिसवर कोणाचा वशिला नको. या शहरातील मुलांसाठी एकच मैदान एवढ मोठ आहे. तर त्यांना प्रायोरिटी बेसिसवर त्यांना देण्यात यावे.

**मा. आयुक्त :-**

हा विषय मा. महासभेपुढे आणू.

**मदन उदितनायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, जैसे कुस्ती का है, होना चाहिए। लेकीन सुभाषचंद्र बोस मैदान जैसा मैदान है, वैसे मैदान शहर के अन्य भागो मे भी होना चाहिए। एक ही मैदान मे सबकुछ लागते जायेंगे और दुसरी जगह कुछ नही करेंगे। तो अपने जो अन्य गार्डन के रिर्झव्हेशन इस्ट मे है। मिरा रोड मे है। शहर के अन्य भागो मे भी डेव्हलप करके उसमे नई नई चिजे शुरू कि जाए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आता हे सावंत साहेब बोलले ना, आपल्या मिरा भाईंदर महापालिकेचे सुभाषचंद्र बोस मैदान हे जे आहे. तिथे फक्त एकच ग्राउंडला परमिशन देतात. ॲक्चुअली आपण तिथे कमित कमी तीन विकेट खेळू शकतो. आज मुंबईला एवढे मोठे स्टेडीयम आहे. तिथे २२ विकेट आहे. आणि आपल्याकडे फक्त एकच विकेट आहे. तर थोडस प्लानिंग करा. आपण तिथे आणखिन ३ क्रिकेट टीम खेळू शकतो. आणि प्रत्येक संघटनेला एक एक क्रिज बाउंसर दिले ना तर आपल्या खेळांना भरपुर वाव मिळेल.

**मिलन म्हात्रे :-**

नुसत क्रिकेटचा कशाला विचार करता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दुसऱ्या खेळाच पण करूया ना.

**मिलन म्हात्रे :-**

मग बाकीच्या खेळांसाठी काय आरक्षित ठेवले. खो खो आहे, फुटबॉल्स आहे.

**अनिल सावंत :-**

याच्यावर प्रशासनाची काय भुमिका आहे ती जरा स्पष्ट करा.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला या स्टेडीयममध्ये बांधायचा विचार नसेल तर, आपण डोंगरीला जातो. जर तिथे जाताना डाव्या हाताला व्यायाम शाळा आहे. व्यायाम शाळेसमोर घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय असा आहे की, डोंगरी हे थोडस शहराच्या लांब आहे.

**हेलन गोविंद :-**

साहेब, मी काय बोलते की, विकासाची जी कामे आहेत ती आमची होत नाही. आणि इथे आपली नगरपालिका खर्च करणार तर ती रजिस्टर आहे का नाही ते बघा ना. ती रजिस्टर कधी झाली याची चौकशी करा ना.

**मा. आयुक्त :-**

होत नाही म्हणजे काय होत नाही. विकासाची कामे होत नाही म्हणजे काय? आता २५ फुटाचा रोड होता तो १५० फुटावर नेला. रेल्वे फाटकाला थांबत होते ते ओव्हरब्रिज वरून येतात. स्टेडीयम चालू आहे. उत्तनचा रस्त चांगला झाला.

**मा. सभापती :-**

उत्तनचा रस्ता चांगला नाही झाला.

**हेलन गोविंद :-**

साहेब, किती वर्ष झाले उत्तनचा रस्ता व्यवस्थित होत नाही. म्हणून बोलले की, विकासाची कामे होत नाही.

**दिपक खांबित :-**

उत्तनचा रस्ता आहे ना. त्याचे इंन्स्टीमेट मा. महासभेने मंजुर केल होत. आणि ते बजेट पेक्षा जास्त मंजुर केले. म्हणून ठराव इथे अडकला. आता आपण काय ठरवले की, तरतुदीप्रमाणे रस्त्याची कामे आणायची आणि पुढच्या वेळेला विषय आणतो.

**मदन उदितनायण सिंह :-**

वह रस्ता एम.एम.आर.डी.ए. मे नही है।

**मा. आयुक्त :-**

पावसामध्ये डांबरीरस्ता व्यवस्थित होत नाही. आपण पावसाळा गेल्यानंतर तो रोड करायला घेवू.

**अनिल सावंत :-**

साहेब, तो जो उत्तन चौक रस्ता आहे तो बी.ओ.टी. तत्वावर राहू शकत नाही का?

**मा. आयुक्त :-**

१० टक्के, १५ टक्के रोड खराब होता है तो पॅच वर्क ही करते है। टोटल रोड खराब हुआ तो फुल रोड लेते है।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पॅच रोडचा ठराव होउन २० दिवस झाले अजुन मेन रोडचे काम सुरू नाही झाले. काय प्रकार आहे?

**मा. आयुक्त :-**

मेन रोडला सुरू झाले.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२ मी पुन्हा वाचतो. भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानात कुस्ती सरावाकरीता शेड बांधून जागा भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १२ तहकुब करण्यात येत आहे. पुढचा विषय घेण्यात यावा.

(मा. सभापतींच्या आदेशाने सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, मिरारोड ते चेना व मुर्धा ते उत्तन विभाग बाजार लिलाव (१२ महिने) बोली रक्कम स्विकारणेस मंजुरी देणे.

**शानु गोहिल :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता १२ महिन्यांच्या कालावधीसाठी बाजार फी वसूलीकरीता अभिकर्ता (एजंट) नेमणेकामी किमान देकाराची रक्कम मिरारोड ते चेणा विभागासाठी रु. ९४,६०,०००/- व मुर्धा ते उत्तन विभागासाठी

रु. ३,८१,७००/- निश्चित करण्यांत आलेली होती. त्यानुसार दि. २१/०५/२००९ रोजी **“दै. सामना, दै. सकाळ व दै. सन्मित्र”** या वृत्तपत्रात बोली पद्धतीने लिलावाची जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन दि. ३०/०५/२००९ रोजी मा. आयुक्त सो. यांचे दालनात लिलाव घेण्यांत आले.

लिलावामध्ये भाग घेण्यासाठी प्राप्त झालेल्या खालील अर्जदारांना बोली लावण्यांस परवानगी देण्यांत आली, त्यानुसार खालीलप्रमाणे लिलाव धारकांनी बोली लावलेली आहे.

**मिरारोड ते चेणा विभाग किमान देकाराची रक्कम रु. ९४,६०,०००/-**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री. राजशेखर शिवगुंडे | १,२९,००,०००/- |
| २ | मे. अनायडा इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| ३ | **श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा** | **१,३८,००,०००/-** |
| ४ | श्री. जूगलकिशोर राधाकिसन जोशी | बोली लावली नाही |
| ५ | मे. आदिता इंटरप्रायजेस | १,३७,००,०००/- |
| ६ | मे. गुडलक कन्स्ट्रक्शन कं. | १,२१,००,०००/- |
| ७ | मे. गौरव कन्स्ट्रक्शन | १,२६,००,०००/- |
| ८ | मे. ललित कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| ९ | श्री. देवानंद जयदेव किणी | बोली लावली नाही |
| १० | श्री. अनिल रामचंद्र काजरोळकर | बोली लावली नाही |
| ११ | मे. शिवशक्ती ट्रान्सपोर्ट | बोली लावली नाही |
| १२ | मे. प्रशांत एजन्सी | १,३१,००,०००/- |
| १३ | श्री. रविराज राठोड | १,३३,००,०००/- |
| १४ | मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| १५ | मे. राज कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| १६ | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| १७ | मे. चंदना कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |

**मुर्धा ते उत्तन विभाग किमान देकाराची रक्कम रु. ३,८१,७००/-**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| २ | श्री. मॅक्सी मनवेल ग्रेशीयस | बोली लावली नाही |
| ३ | श्री. राजशेखर शिवगुंडे | ४,२०,५००/- |
| ४ | श्री. जूगलकिशोर राधाकिसन जोशी | बोली लावली नाही |
| ५ | **मे. राठोड असोसिएट्स** | **४,३०,०००/-** |
| ६ | मे. आदिता इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| ७ | श्री. अतुल प्रभाकर ठाकुर | बोली लावली नाही |
| ८ | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा | बोली लावली नाही |
| ९ | मे. ललित कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| १० | मे. यश इंटरप्रायजेस | ४,११,०००/- |
| ११ | श्री. रविराज राठोड | ४,२७,०००/- |
| १२ | श्री. देवानंद जयदेव किणी | बोली लावली नाही |
| १३ | मे. शिवशक्ती ट्रान्सपोर्ट | बोली लावली नाही |
| १४ | मे. प्रशांत एजन्सी | बोली लावली नाही |
| १५ | श्री. अनिल रामचंद्र काजरोळकर | बोली लावली नाही |
| १६ | मे. राज कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| १७ | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |

वरीलप्रमाणे मिरारोड ते चेणा विभागाकरीता श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा यांनी जाहीर बोलीमध्ये सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम रु. १,३८,००,०००/- बोलली आहे. तसेच मुर्धा ते उत्तन विभागाकरीता मे. राठोड असोसिएट्स यांनी जाहीर बोलीमध्ये सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम रु. ४,३०,०००/- बोलली आहे. सदर जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा या महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकारापेक्षा जास्त दराच्या आहेत.

तरी सदर जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा जास्त असल्याने **मिरारोड ते चेणा** विभागासाठी **सायमन बस्त्याव अल्मेडा** यांची बोली रक्कम **रु. १,३८,००,०००/-** (अक्षरी रु. एक कोटी अडतीस लाख मात्र)

व **मुर्धा ते उत्तन** विभागासाठी **मे. राठोड असोसिएट्स** यांची बोली रक्कम **रु. ४,३०,०००/-** (अक्षरी रु. चार लाख तीस हजार मात्र) दि. ०१/०७/२००९ ते दि. ३०/०६/२०१० हया कालावधीसाठी बाजार लिलावास मंजूरी देण्यांत येत आहे.

**टेरी परेरा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, नालेसफाई रिन्युव्ह बाबत काय झाले? साफसफाई कुठपर्यंत आले.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, ह्याच्यामध्ये अटीशर्तीचे पालन करा.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये दिलेल्या आहेत ना.

**अनिल सावंत :-**

त्या अटीशर्तीचे पालन करा. सोमवार - शनिवार बाजार नाही. साहेब ह्यात अटीशर्ती बनतात पण, ह्याच्यापुर्वी सुद्धा भाईंदर पुर्वे चा ठेका गेलेला आहे. अटीशर्तीचे पालन ठेकेदार करत नाही. तरीसुद्धा कंटीन्यु ठेका चालू आहे. कारवाई व्हायला पाहिजे. अटीशर्ती बनवल्या ठिक आहे.

**मा. आयुक्त :-**

अटीशर्ती प्रमाणे तंतोतंत पालन करायचे आदेश द्या. त्यामध्ये टेंडर मागवल्यानंतर एक दुरूस्ती केलेली आहे. पुर्वी खाते व्हाईज टेंडर पब्लिश होत होते आणि खाते प्रमुख पावत्या फाडत होत्या. त्यामुळे कोणाला द्यायचे हे जरा अडचणीचे होते. त्यामुळे महापालिकेचे नुकसान होत होते. म्हणून डायरेक्ट पैसे भरायलाच अलाउड केलेले आहे. म्हणजे कोणीही यावे अर्ज द्यावे. पैसे भरावे आणि टेंडर घ्यावे.

**मा. सभापती :-**

खांबित साहेबांना बोलवून २० दिवस झालेले आहे. आमच्या येथे चर्चचा रोड आहे. तिकडे नो पार्कींग झोन चा बोर्ड लिहायला पाहिजे. ते २० दिवसापासुन बोर्ड लावतात.

**मा. आयुक्त :-**

आज सुर्यास्तापुर्वी बोर्ड लागतील.

**मा. सभापती :-**

जर बोर्ड नाही लागले तर १५६ नुसार कारवाई करावी.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, नालेसफाईचा अहवाल येण्यापुर्वी आपण नेहमी स्टँडींग समोर खर्चाचाच बाजु आणतो. ज्यावेळी मा. महासभेमध्ये बजेट सँक्शन झाले त्यावेळी जमेच्या बाजु सुद्धा आपण वाढवलेल्या आहेत. त्याच्यावर काही कारवाई होत नाही. परवाना शुल्क चे आपण १० करोड रू. प्रोव्हीजन दिलेले आहे. अजुनपर्यंत परवाने शुल्क दिले जात नाही. त्याच्यामध्ये सुद्धा अडचणी आहेत. त्याचे ही इनकमचे करा ना. आता वेदर शेडसाठी ठराव पास झालेला आहे. काल मिरा रोडमध्ये, जेसल पार्कमध्ये सर्व ठिकाणी तुम्ही नोटीस काढलेल्या आहेत. पण ते वेदर शेड घ्यायला लोक येतात आणि त्यांना चकरा मारायला लागतात.

**मा. आयुक्त :-**

हा अंमल बजावणीचा भाग आहे. आपण त्या लोकांना अर्ज घेवून या असे मी सांगणार नाही. का बांधले हे विचारणार?

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, फॅसिलिटी करून द्या. वेदरशेड गरजेजे आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही द्यायला लागलो ना. परवानगी कोणाची शिल्लक आहे.

**जुबेर इनामदार :-**

आमच्या वॉर्ड ऑफिसमध्ये करून द्या. विन्डो सिस्टीम करा.

**अनिल सावंत :-**

वेदरशेडसाठी त्यांच्या रिक्वायरमेंट बघा. एक सुद्धा ते व्यवस्थित देवू शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये आम्ही सर्वांना देत नाही. आणि बिल्डींग परमिशन आणि कंप्लेशन घेतलेल्या लोकांनाच देतो.

**अनिल सावंत :-**

कंम्प्लेशन मिन्स ओ.सी.

**मा. आयुक्त :-**

हो ओ.सी. ज्या बिल्डींगला आहे. त्याच बिल्डींगला देतो.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, माझ्या माहितीप्रमाणे ९५ च्या अगोदर राज्य शासनाने गॅझेट काढून ऑफिशिअली केल्या यामुळे तुम्हाला ओ.सी. काढायची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

झोपड्या.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, माझ्या माहितीप्रमाणे या शहरामध्ये ५० टक्के बिल्डींगला ओ.सी. नाही. मग तुम्ही ते काय पाडून टाकणार का?

**अनिल सावंत :-**

त्यांचे काय करणार?

**जुबेर इनामदार :-**

आपला महसुल जमेल. लोकांच काम होणारच आहे. लोक वेदरशेड नाही टाकणार असे नाही.

**अनिल सावंत :-**

पावसामध्ये दुकानासमोर वेदरशेड टाकणार नाही. असे होणारच नाही.

**मा. आयुक्त :-**

अधिकृत / अनधिकृत बघणार नाही का?

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

कमिशनर साहेब, रेल्वे समांतर ईस्ट का जो गटर है, वह अभितक पुरा साफ नही हुआ है। उधर ५ फुट पाणी भरा हुआ है।

**मा. आयुक्त :-**

साफ हुआ है, सिर्फ मटेरियल निकालना बाकी है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

साफ नही हुआ। बाजु मे नही पडा है। अंदर मटेरियल पडा है।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

साहब आप जाकर सर्व्हे करके आईये। इसमे बहोत गंदा पानी निकलाही नही। और उसका पानी निकालने का रस्ता है क्या? उसकी जानकारी चाहीए।

**मा. आयुक्त :-**

यांना आणि त्यांना सभा संपल्यानंतर दाखवायला घेउन जा.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, त्या परवाना विभागच, आता दुकानाचा विषय निघाला म्हणून. साहेब, कमित कमी २८ हजार आस्थापना आहे. परवाना विभागाचे स्थायी समितीमध्ये अर्थ संकल्पामध्ये त्याची तरतुद केली होती की, १० कोटी रू. पर्यंत आपल्याला उत्पन्न झाले पाहिजे. तर असे येणार नाही.

**मा. आयुक्त :-**

साहेब, या विषयावर तुम्ही मगाशी तलाठणी दिली. आता ग्राउंड प्लस थ्री ला परवानगी दिली आणि त्यांनी ७ केले. वेदरशेड म्हणजे स्लॅप करून वरच्यावर यायचे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, येथे दुकानाच्या वेदरशेडवर चर्चा चालू होती. बिल्डींगच्या वरच्या वेदरशेड बद्दल चर्चा चालू नव्हती.

**अनिल सावंत :-**

बिल्डींगला नका देवू. पण दुकानाचे काय?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपण ४ फुटला परवानगी दिलेली आहे. ४ फुट पावसाचे पाणी दुकानामध्ये नाही आले पाहिजे त्याच्याकरिता.

**मा. आयुक्त :-**

आमच्याकडे आता चार पाच शिल्लक आहेत परवा आलेले ४१ आहे. जेसलपार्कचे आणि आता आपण प्रत्येक वेदरशेडमध्ये नोटीस दिली. लोकांचे अर्ज आहे. त्याच्यामध्ये कोर्ट मॅटर आहे. एम.आर.टी.पी. ने दाखल केलेली आहे आणि ह्या सगळ्यामध्ये द्यायला पाहिजे म्हणून आपण एकही पेंडींग ठेवत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

वेदरशेड के लिए डॉक्युमेंट क्या क्या लगता है? साहेब, आम्हाला जरा शॉपची माहिती द्या ना.

**शानु गोहिल :-**

वेदरशेड के लिए डॉक्युमेंट क्या क्या चाहिए?

**मा. आयुक्त :-**

डॉक्युमेंट का परचेस कागद और पब्लिश.

**शानु गोहिल :-**

जिस सोसायटी को मस्ट है उसका नही लगेगा क्या? सोसायटी को मस्ट है या नही है?

**मा. आयुक्त :-**

मस्ट है।

**शानु गोहिल :-**

और अगर नही होगी तो आप फिर भी उसकी परवानगी देंगे।

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, त्या डिझास्टर मॅनेजमेंट बद्दल आपली काय तयारी आहे? पावसाळा जवळ आलेला आहे. आपण आता काम काय केले? ट्री ॲथॉरिटीचे प्रमुख आज हजर नाही. त्या डिपार्टमेंटला जे मशिनरी दिलेत.......

**प्रकरण क्र. १३ :-**

मिरारोड ते चेना व मुर्धा ते उत्तन विभाग बाजार लिलाव (१२ महिने) बोली रक्कम स्विकारणेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता १२ महिन्यांच्या कालावधीसाठी बाजार फी वसूलीकरीता अभिकर्ता (एजंट) नेमणेकामी किमान देकाराची रक्कम मिरारोड ते चेणा विभागासाठी रु. ९४,६०,०००/- व मुर्धा ते उत्तन विभागासाठी रु. ३,८१,७००/- निश्चित करण्यांत आलेली होती. त्यानुसार दि. २१/०५/२००९ रोजी **"दै. सामना, दै. सकाळ व दै. सन्मित्र"** या वृत्तपत्रात बोली पद्धतीने लिलावाची जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन दि. ३०/०५/२००९ रोजी मा. आयुक्त सो. यांचे दालनात लिलाव घेण्यांत आले.

लिलावामध्ये भाग घेण्यासाठी प्राप्त झालेल्या खालील अर्जदारांना बोली लावण्यांस परवानगी देण्यांत आली, त्यानुसार खालीलप्रमाणे लिलाव धारकांनी बोली लावलेली आहे.

**मिरारोड ते चेणा विभाग किमान देकाराची रक्कम रु. ९४,६०,०००/-**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री. राजशेखर शिवगुंडे | १,२९,००,०००/- |
| २ | मे. अनायडा इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| ३ | **श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा** | **१,३८,००,०००/-** |
| ४ | श्री. जूगलकिशोर राधाकिसन जोशी | बोली लावली नाही |
| ५ | मे. आदिता इंटरप्रायजेस | १,३७,००,०००/- |
| ६ | मे. गुडलक कन्स्ट्रक्शन कं. | १,२१,००,०००/- |
| ७ | मे. गौरव कन्स्ट्रक्शन | १,२६,००,०००/- |
| ८ | मे. ललित कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| ९ | श्री. देवानंद जयदेव किणी | बोली लावली नाही |
| १० | श्री. अनिल रामचंद्र काजरोळकर | बोली लावली नाही |
| ११ | मे. शिवशक्ती ट्रान्सपोर्ट | बोली लावली नाही |
| १२ | मे. प्रशांत एजन्सी | १,३१,००,०००/- |
| १३ | श्री. रविराज राठोड | १,३३,००,०००/- |
| १४ | मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| १५ | मे. राज कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| १६ | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| १७ | मे. चंदना कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |

**मुर्धा ते उत्तन विभाग किमान देकाराची रक्कम रु. ३,८१,७००/-**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| २ | श्री. मॅक्सी मनवेल ग्रेशीयस | बोली लावली नाही |
| ३ | श्री. राजशेखर शिवगुंडे | ४,२०,५००/- |
| ४ | श्री. जूगलकिशोर राधाकिसन जोशी | बोली लावली नाही |
| ५ | **मे. राठोड असोसिएट्स** | **४,३०,०००/-** |
| ६ | मे. आदिता इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |
| ७ | श्री. अतुल प्रभाकर ठाकुर | बोली लावली नाही |
| ८ | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा | बोली लावली नाही |

| | | |
|---|---|---|
| **९** | मे. ललित कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| **१०** | मे. यश इंटरप्रायजेस | ४,११,०००/- |
| **११** | श्री. रविराज राठोड | ४,२७,०००/- |
| **१२** | श्री. देवानंद जयदेव किणी | बोली लावली नाही |
| **१३** | मे. शिवशक्ती ट्रान्सपोर्ट | बोली लावली नाही |
| **१४** | मे. प्रशांत एजन्सी | बोली लावली नाही |
| **१५** | श्री. अनिल रामचंद्र काजरोळकर | बोली लावली नाही |
| **१६** | मे. राज कन्स्ट्रक्शन | बोली लावली नाही |
| **१७** | मे. एम. एस. इंटरप्रायजेस | बोली लावली नाही |

वरीलप्रमाणे मिरारोड ते चेणा विभागाकरीता श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा यांनी जाहीर बोलीमध्ये सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम रु. १,३८,००,०००/- बोलली आहे. तसेच मुर्धा ते उत्तन विभागाकरीता मे. राठोड असोसिएट्स यांनी जाहीर बोलीमध्ये सर्वात जास्त दराची बोलीची रक्कम रु. ४,३०,०००/- बोलली आहे. सदर जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा या महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकारापेक्षा जास्त दराच्या आहेत.

तरी सदर जाहीर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा जास्त असल्याने **मिरारोड ते चेणा** विभागासाठी **सायमन बस्त्याव अल्मेडा** यांची बोली रक्कम **रु. १,३८,००,०००/-** (अक्षरी रु. एक कोटी अडतीस लाख मात्र) व **मुर्धा ते उत्तन** विभागासाठी **मे. राठोड असोसिएट्स** यांची बोली रक्कम **रु. ४,३०,०००/-** (अक्षरी रु. चार लाख तीस हजार मात्र) दि. ०१/०७/२००९ ते दि. ३०/०६/२०१० हया कालावधीसाठी बाजार लिलावास मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदक :- श्री. टेरी परेरा**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**